पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५७ ● बुधवार, दि.२ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

उद्याचा भविष्यकाळ वर्तमानाच्या त्यागातून निर्माण होत असतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट
बार्शिटाकळी शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
आजम खान
तालुका प्रतिनिधी
+91 7875280943

## »थोडक्यात

### शिवसेनेच्या वादावर आज सुनावणी

**दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात आज २ सप्टेंबरपासून पुन्हा सुनावणी होणार आहे. ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांच्या जोरदार युक्तिवादानंतर आज शिंदे गटाकडून युक्तीवादाला सुरुवात होणार आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून शिवसेनेचं चिन्ह गोठवण्याची मागणी करण्यात आली. आजपासून शिवसेनेकडून मुकुल रोहतगी, निरज किशन कौल हे युक्तीवाद करतील. त्यामुळेच हा युक्तिवाद करत असताना पक्षाची बाजू आणि पुरावे भक्कम रीतीने मांडण्यासाठी काल दिल्लीत एकनाथ शिंदे सर्व वकिलांशी आणि कायदे तज्ज्ञांशी चर्चा केली. पक्ष आणि चिन्ह शिंदे गटाकडे राहावे यासाठी कायद्याच्या सर्व बाजूंचा अभ्यास करून सुप्रीम कोर्टात बाजू मांडण्यात यावी असा एकनाथ शिंदेंचा प्रयत्न आहे.

### दिशा सालियन मृत्यू प्रकरण सीबीआयकडे

**मुंबई :** दिशा सालियन मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं निकाल दिला आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं सीबीआय अधिकारी नियुक्तीचे आदेश दिले आहेत. तसेच, या प्रकरणी बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेशही मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. याबाबत दिशा सालियनचे वकील निलेश ओझा यांनी महत्वाची माहिती दिली आहे. आदित्य ठाकरे आणि सरकारी पक्षाचे युक्तीवाद कोर्टाने फोटाळल्याची माहिती देखील वकिलाने दिली आहे. दिशा सालियानचे वडील सतिश सालियान यांचे जबाब नोंदवून गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

### आता पुन्हा पाऊस सक्रिय होणार!

**मुंबई :** राज्यातील पावसाच्या चिंतेने व्याकूळ झालेल्या शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. ऑगस्ट महिन्यात पाऊस थांबल्यामुळे बळीराजाची चिंता वाढली होती. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील २ ते ३ दिवसांत विदर्भ आणि त्याला लागून असलेल्या भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

# जिल्हा परिषद अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले !

# PRC अकोल्यात दाखल..!

## बांधकाम विभागातील महाघोटाळ्यांवर होणार का सर्जिकल स्ट्राइक ?

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला** जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सध्या प्रचंड खळबळ उडाली आहे. पंचायत राज समिती अकोल्यात दाखल होताच भ्रष्ट अधिकाऱ्यांची आणि कंत्राटदारांची झोप उडाली आहे. समितीचे अध्यक्ष, समिती सदस्य व सर्व आमदार आणि चौकशी अधिकारी जिल्हा परिषदेत धडकले असून, आता बांधकाम विभागातील कोट्यवधींच्या गैरकारभाराचा हिशोब चुकता होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.केवळ रस्त्यांच्या डांबरीकरणाचे थर तपासून भागणार नाही, तर जिल्हा परिषदेने तयार केलेल्या या बोगस रस्त्यांच्या माहितीचे आणि प्रत्यक्ष रस्त्यांचे खोलवर 'खोदकाम' करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. कोट्यवधींचा शासकीय निधी लाटणाऱ्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी जमा केलेल्या असंपदा व मालमत्तेची आणि संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी होणार की नाही, हा सर्वात मोठा प्रश्न अनुत्तरित आहे. आता अकोल्यात डेरेदाखल झालेली पंचायत राज समिती या सर्व गैरकारभाराचा खरा पर्दाफाश करणार की ही चौकशीही कागदावरच राहणार, याकडे जनतेचे डोळे लागले आहेत!



### पंचायती राज समितीत यांचा आहे समावेश

पंचायत राज समितीच प्रमुख जालना येथील आ.संतोष दानवे यांच्या नेतृत्वात आ. प्रताप अडसड, आ.दीपक केसरकर, आ. विक्रम काळे, आ.नितीन देशमुख, आ.किरण लहामटे , आ.विजयसिंह पंडित, आ.संजय मेश्राम, आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, आ.सदाभाऊ खोत, आ. जयंत आसगावकर यांच्यासह पंचायती राज समितीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. प्रशासनाकडून २८ आमदारांची लिस्ट देण्यात आली. पण, उपस्थित आमदारांची नावे जिल्हा परिषदेने दिली आहे.

### पदोन्नती अन् निलंबनात मोठा घोळ

अकोला जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन, आरोग्य व शिक्षण विभागात पदोन्नती, निलंबन आणि बदल्यांमध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप होत आहे. संगणक व भाषा परीक्षा न देता, वयाचे व इतर बोगस दाखले जोडून बेकायदेशीर पदोन्नत्या तसेच 'इन्क्रिमेंट' लाटल्याचे प्रकार समोर आले आहेत. आरोग्य विभागात 'रात्रीतून निलंबन आणि दिवसा पुनर्गठन' असा कारभार सुरू असून औषध खरेदीतही मोठा झोल झाल्याची चर्चा आहे. शिक्षण विभागात शिक्षकांच्या बदल्यांचा बाजार भरला असताना अधिकारी मात्र मोकळे आहेत. बदली घोटाळ्यात शिक्षकांचे निलंबन झाले. पण, बोगस प्रमाणपत्र देणारे आणि त्या आधारे बदल्या करणारे मात्र मोकाट आहेत. या पार्श्वभूमीवर, अकोला दौऱ्यावर येणारी पंचायत राज समिती या भ्रष्टाचाराच्या खजिन्यावर 'सर्जिकल स्ट्राईक' करून चौकशीचे आदेश देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पी डब्ल्यू डी आणि जिल्हा परिषदेने तयार केले रस्ते

जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग आणि राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कागदपत्रांवर एकाच रस्त्याची दोन-दोनदा कामे दाखवून निधी हडपल्याच्या गंभीर सुरस कथा समोर येत आहेत. पांदण रस्त्यांच्या कामांत तर अतोनात भ्रष्टाचार झाला असून, प्रत्यक्षात मातीही न हलवता कागदोपत्री लाखो रुपये उचलण्यात आले आहेत. पी आर सी समिती या पांदण रस्त्यांमधील महाघोटाळ्याची चौकशी करून सत्य बाहेर आणणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### भोकर ते काळेगाव रस्ता घोटाळ्याचे जिवंत उदाहरण!

नुकत्याच समोर आलेल्या चौकशी अहवालानुसार, तेल्हारा तालुक्यातील भोकर ते काळेगाव (ग्रा.मा. १६) रस्त्याच्या कामात तांत्रिक व प्रशासकीय नियमांची पार धूळधाण उडवण्यात आली आहे. २ कोटींच्या या कामात चक्क दोन पुलांचे बांधकाम कागदोपत्री गायब करण्यात आले, एक्स्ट्रा एटम ची पूर्वपरवानगी न घेता अनधिकृत कामे झाली आणि गुणवत्तेच्या सर्व चाचण्या खाजगी प्रयोगशाळांमधून आटोपल्या गेल्या. कामाचा दर्जा इतका निकृष्ट आहे की रस्ता ठिकठिकाणी खचला असून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

### जूऩ्या आश्वासनांची फाईल उघडणार का ?

जिल्हा परिषदेच्या बांधकाम व सामान्य प्रशासन विभागात मोठा सावळा गोंधळ समोर येत असून, कोट्यवधींच्या संपत्तीकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. काही वर्षांपूर्वी अकोला दौऱ्यावर आलेल्या विधिमंडळाच्या पंचायत राज समितीला जिल्हा परिषद प्रशासनाने दिलेली आश्वासने अद्याप कागदावरच राहिल्याने समिती आता या प्रकरणाची जुनी फाईल उघडून चौकशी करणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. सिव्हिल लाईन चौकातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या दुकानांचे भाडेकरार आणि नूतनीकरण प्रदीर्घ काळापासून लटकलेले आहे. अनेक गाळ्यांचे भाडेकरार संपूनही त्यांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही, तर काही दुकानांचे मूळ करारदार मृत झालेले असतानाही प्रशासनाने त्या मालमत्ता ताब्यात घेतलेल्या नाहीत. मृत व्यक्तींच्या नावावरच या दुकानांचा कारभार सुरू असून, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हा गैरप्रकार झाकला जात असल्याची जोरदार चर्चा आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात

# बनावट बिलांचा घोटाळा

## विद्यापीठाची 40 लाखांची तक्रार, 4 लाखांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (पंदेकृवि), अकोला येथील कृषी महाविद्यालयात बनावट व्हॉउचर्स आणि कागदपत्रांच्या आधारे शासकीय निधीचा गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे तत्कालीन अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात सिटी न्यूज सुपरफास्ट व आर आर सी न्यूजने पाठपुरावा केल्यामुळे गुन्हा दाखल झाला. गेल्या महिन्याभरापासून या विषयाचे सविस्तर वृत्त, चौकशी समितीचा अहवाल वाचकांसमोर आणून आर आर सी समुहाने भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांच्या विरोधात पाठपुरावा केला. अखेर एम.आय.डी.सी पोलिसांनी या प्रकरणात रात्री गुन्हा दाखल केला.







### ७४ फाईल्स गायब; ४० लाखांच्या घोटाळ्याची शंका

विद्यापीठाच्या सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या कालावधीतील लेखा परीक्षणात मोठा गैरव्यवहार समोर आला आहे. तपासणीदरम्यान कृषी महाविद्यालयातील ७४ महत्त्वाच्या फाईल्स आणि वर्क रजिस्टर क्र. ७ कार्यालयातून गायब असल्याचे निष्पन्न झाले आहे. गायब झालेल्या दस्तऐवजांमुळे घोटाळ्याची व्याप्ती सुमारे ४० लाख रुपयांपर्यंत असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, प्राथमिक चौकशीत १८ देयकांपैकी १३ देयके पूर्णपणे बनावट आढळली, ज्याद्वारे कंत्राटदाराला ४,०१,६८७/- ची बेकायदेशीर रक्कम अदा करण्यात आली होती. त्यामुळे पोलिसांनी सध्या ४.०१ लाख रुपयांच्या प्रत्यक्ष फसवणुकीच्या पुराव्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

### या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर गुन्हे दाखल

विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय माणिकराव भोयर यांनी मा. कुलगुरूंच्या मंजुरीने एमआयडीसी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून खालील आरोपींवर गुन्हे दाखल झाले आहेत. तत्कालीन भंडारपाल स्व. मदन लांजेवार (मृतक), स्व. पंकज पाल (मृतक) यांच्यासह सौरभ मोरे, विलास गुल्हाने, सहायक कुलसचिव हंसराज राठोड, तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता: डॉ. श्यामसुंदर माने (सध्या संशोधन संचालक) यांचा समावेश आहे. त्याच बरोबर या घोटाळ्यात सहभागी असलेला कंत्राटदार संतोष म्हातारमारे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात इतर कोणावर चौकशी अंती गुन्हे दाखल होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपींवर भारतीय दंड संहिता च्या कलम ४२० (फसवणूक), ४०९ (शासकीय कर्मचाऱ्याकडून विश्वासघात), ४६४, ४६८, ४७१ (बनावट दस्तऐवज तयार करणे व वापरणे) आणि १२०-ब (गुन्हेगारी कट रचणे) अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

### कुलगुरू आणि कुलसचिव कारवाई करणार का ?

गंभीर गुन्ह्यांमध्ये नाव असूनही काही उच्चपदस्थ अधिकारी अद्यापही विद्यापीठात महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवर कार्यरत असल्याने तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. शासकीय नियमांनुसार गंभीर फौजदारी गुन्हे दाखल झालेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करणे बंधनकारक असते. त्यामुळे आता कुलगुरू व कुलसचिव दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून त्यांना निलंबित करणार की प्रकरणावर पांघरूण घालणार, याकडे संपूर्ण शैक्षणिक व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# उपोषणाचे अनेक जिल्ह्यात पडसाद!

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**आंतरवाली सराटी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज ५ वा दिवस आहे. प्रकृती खालावलेली असतानाही जरांगे पाटील आपल्या उपोषणाच्या भूमिकेवर ठाम आहेत. मंगळवारी रात्री जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी उपोषणस्थळी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच मंगळवारी रात्री जालना-भोकरदन ते राजूर रोडवरील केदारखेडा फाटा व पाडळशिंगी टोलनाका परिसरात 'एक मराठा लाख मराठा' अशा घोषणा देत टायर जाळल्याने सुमारे अर्धा किमी ट्रॅफिक जाम झाली होती.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, अधिकाऱ्यांना माझ्याकडे का पाठवले, राजकीय नेत्यांना येता येत नाही का? जोपर्यंत राजकीय नेतृत्व स्वतः येऊन स्पष्ट आश्वासन देत नाही, तोपर्यंत आपले उपोषण सुरूच राहील. हा विषय अधिकाऱ्यांच्या पातळीवरील नाही, त्यामुळे त्यांनी माझ्याकडे येऊ नये. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, आ. प्रसाद लाड छत्रपती संभाजीनगर येथे म्हणाले की, ५८ लाख नोंदींबाबत प्रस्तावाचा मसुदा जरांगेंना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दिला आहे. त्यात त्यांना कोणत्या त्रुटी वाटतात.

# ओबीसी आरक्षणावरुन मंत्रालयात खडाजंगी

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**मुंबई:** राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षणाचा वाद पेटण्याची चिन्हे दिसत असताना दुसरीकडे महायुती सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनीच आपल्याच सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली असल्याचे समोर आले. ओबीसी समाजासाठी असलेल्या राज्य सरकारच्याच योजनांना निधी मिळत नसल्याच्या मुद्द्यावरून ओबीसी मंत्र्यांनी संताप व्यक्त केला. ओबीसी उपसमितीच्या बैठकीवर या मंत्र्यांनी बहिष्कार घातला. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील आणि मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीच्या बैठकीतून तडकाफडकी सभात्याग केला.



ओबीसींच्या कल्याणकारी योजनांना निधीच मिळत नाही, सरकार रस्त्यावर उतरल्याशिवाय अन् आंदोलन केल्याशिवाय ऐकत नाही, असा उद्विग्न संताप त्यांनी व्यक्त केला. मंत्र्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

ओबीसी उपसमितीची या बैठकीला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ओबीसी मंत्री अतुल सावे, गणेश नाईक यांच्यासह विविध विभागांचे उच्चाधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान ओबीसी महामंडळाला निधी मिळण्यास होणाऱ्या विलंबावरून वातावरण तापले. "निधीअभावी अनेक महत्त्वाच्या योजना रखडल्या असून प्रशासकीय उदासीनतेमुळे समाजात प्रचंड असंतोष निर्माण होत आहे," असा घणाघाती आरोप करत या तीनही प्रमुख मंत्र्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला आणि काढता पाय घेतला.

# आरएसएस महिलेला सरसंघचालक करणार का?

## पृथ्वीराज चव्हाण यांचा सवाल; भाजपची कोंडी

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**नाशिक :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महिलेला सरसंघचालक करणार का? असा सवाल राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. चव्हाण यांनी थेट संघ आणि भाजपला हा सवाल करून कोंडी केली आहे. मीडियाशी संवाद साधताना त्यांनी हा सवाल केला. जेव्हा महिलांना संधी देण्याची वेळ होती, तेव्हा राहुल गांधी यांनी प्रियंका गांधींना संधी का दिली नाही, असा सवाल करत भाजपने राहुल गांधींच्या विरोधात राज्यभर आंदोलन सुरू केले आहे. त्याला प्रत्युत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण यांनी हा सवाल केला आहे.काँग्रेस महिला आरक्षणाला विरोध करत आहे हे कोणत्या मूर्खाने सांगितलं हे अगोदर बोलावं. २०२३ मध्ये जेव्हा घटना दुरुस्ती विधेयक आणले तेव्हा आम्ही त्याला पाठिंबा दिला होता. महिला आरक्षणाचे जनकच आम्ही आहोत, असं सांगतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महिलांना सरसंघचालक करणार का? असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

# इथेनॉल साठ्यावर धडक कारवाई

## 3 हजार लीटर अवैध पेट्रोल साठा जप्त, 3 लाखांचा मुद्देमाल ताब्यात

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अकोला पथकाने बेकायदेशीररीत्या साठवून ठेवलेल्या इथेनॉलविरोधात मोठी कारवाई केली. अकोला-दर्यापूर रोडवरील आपातापा गावाच्या हद्दीत एका शेडमध्ये अवैध विक्रीच्या उद्देशाने लपवून ठेवलेला मोठ्या प्रमाणातील इथेनॉलचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत एकूण २ लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाला २ सप्टेंबर रोजी आपातापा गावाच्या हद्दीत अकोला-दर्यापूर रोडलगत असलेल्या एका शेडमध्ये पेट्रोलसह इथेनॉलचा मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर साठा केल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे विभागाच्या पथकाने पंचासमक्ष छापा टाकला.



या कारवाईदरम्यान २०० लिटर क्षमतेचे इथेनॉलने भरलेले २० प्लास्टिकचे बॅरल, तसेच इथेनॉलचा वास असलेले २०० लिटर क्षमतेचे ४२ रिकामे प्लास्टिक बॅरल आढळून आले. हा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय कारवाईदरम्यान २ हजार ९४५ लिटर अवैध पेट्रोलचा साठाही मिळून आला असून तो ताब्यात घेण्यात आला आहे. या प्रकरणी सय्यद अजहर सय्यद ताहिर (२८), रा. वीर लहुजी नगर, इंदिरा गांधी पुतळा, अकोट फैल,अकोला याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक देवेश कोटे करीत आहेत. कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अवैध इथेनॉल व पेट्रोलच्या साठ्याबाबत पुढील तपास सुरू आहे.

# सातरगाव बनावट दारु प्रकरणाला नवे वळण!

## 'दिल्लू'वर 19 गुन्हे तर मोहम्मदवरही 7 गुन्हे

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला :** सातरगाव येथील बनावट दारू कारखाना प्रकरणात तपासादरम्यान आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुख्य आरोपी दिल्लू याच्यावर तब्बल १९ गुन्हे दाखल असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक सीमा झावरे यांनी दिली. तर सध्या पोलीस कोठडीत असलेल्या मोहम्मद या आरोपीवरही ७ ते ८ गुन्हे दाखल असल्याचे त्यांनी सांगितले.

सातरगाव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करत मोठ्या प्रमाणात बनावट दारू निर्मितीचे साहित्य, स्पिरिट, बाटल्या, लेबल तसेच बॉटलिंग मशीन असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. या कारवाईनंतर प्रकरणातील आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमीही तपासली जात आहे. दरम्यान, फरार आरोपी दिल्लू याने अटकपूर्व जामिनासाठी २८ ऑगस्ट रोजी न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने १ सप्टेंबर रोजी न्यायालयासमोर आपले म्हणणे मांडले असल्याची माहिती अधीक्षक सीमा झावरे यांनी दिली. त्यामुळे आता न्यायालय या प्रकरणात काय निर्णय देते, याकडे लक्ष लागले आहे.

सध्या मोहम्मद हा आरोपी पोलीस कोठडीत असून,त्याच्याकडून या बनावट दारू निर्मितीच्या कारखान्याबाबत महत्त्वाची माहिती मिळविण्याचा प्रयत्न तपास यंत्रणेकडून सुरू आहे. या कारखान्यामागे नेमके कोणाचे आर्थिक पाठबळ होते, बनावट दारूचा माल कुठे आणि कोणामार्फत पोहोचविला जाणार होता, तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.१९ गुन्हे दाखल असलेल्या दिल्लूच्या अटकपूर्व जामीन अर्जाला राज्य उत्पादन शुल्क विभागाने न्यायालयात काय आक्षेप नोंदवले, याबाबतची भूमिका आता या प्रकरणातील पुढील तपासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे.



# हिवरखेडच्या माऊली कडून ग्राहकांना तारीख पे तारीख

## ग्राहकांच्या वतीने पोलिस स्टेशनला फसवणुकीचा अर्ज

प्रतिनिधी २ सप्टेंबर




**हिवरखेड :** माऊली मल्टिस्टेट शाखा या बँकने शेकडो ग्राहकांना चुना लावल्याचा अर्ज ग्राहकांनी थेट पोलिस स्टेशन मध्ये दाखल केला,

माऊली अर्बन या को सोसायटी मध्ये अनेक ग्राहकांनी चांगले व्याज दर मिळते या लालचापोटी ग्राहकांनी मोठ मोठ्या रक्कम जमा केल्या, तर या शाखेचे एजंट यांनी सुद्धा आपल्याला चांगले कमिशन मिळावे म्हणून खूप जास्त प्रमाणात ग्राहकांचे खाते आपल्या बँक मध्ये उघडण्याचे कार्य युद्धस्थरावर केले, परंतु गेल्या काही दिवसांपासून या शाखेकडून ग्राहकांना त्यांचे ठेवीचे पैसे बँके कडून परत देणे बंद झाले याबाबत ग्राहकांनी नाराजी व्यक्त करीत बरीच प्रतीक्षा केली मात्र बँक कडून फक्त तारीख पे तारीख देण्यात आली, या दरम्यान आपल्या कष्टाचे पैसे बुडाले तर नाही ना असा विचार केल्याने एका ग्राहकाचे निधन झाल्याची चर्चा या शाखेचे ग्राहक करीत आहेत, तरीही या बँकेला जाग आली नाही व बँकेचे काही संचालक, कर्मचारी या शाखेचे संस्थापक अध्यक्ष नाशिक यांचा मूळ निवासी जाऊन आले त्यांना सुद्धा मिळाली ती फक्त तारीख. यावरून ३१, ऑगस्ट रोजी दुपारी आमची फसवणूक झाली असा अर्ज शेख नाजीम शेख हुसेन रा. इंदिरा नगर हिवरखेड व शुभम वाकोडे या ग्राहकांनी पोलिस स्टेशनमध्ये केला. ओमप्रकाश चतुरकार उप शाखा व्यवस्थापक यांच्या नावाने अर्ज दिला आहे.

पोलिसांनी अर्ज स्वीकारला असून आणखी काही ग्राहकांचे अर्ज येतील. सर्व अर्ज आम्ही ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निबंधक कार्यालय अकोला यांना सुपुर्द करू असे हिवरखेड पोलिसांनी सांगितले. हिवरखेडसह आजुबाजूच्या खेड्यापाड्यातील ग्राहकांनी मोठ्या आशेने व या बँकेत ओळखीचे संचालक असल्याने आपल्या ठेवी येथे जमा केल्या. मात्र याचे उलट फळ ग्राहकांना मिळत आहे. आमचा हक्काचा पैसा बँकेकडून मिळाला नाही तर आंदोलन, उपोषण करू असा इशारा ग्राहकांनी दिला आहे.

### आम्ही अध्यक्षांची भेट घेऊ

वरिष्ठाकडून आम्हाला ग्राहकांना व्हिड्रोल करण्याची ३१ ऑगस्ट ही तारीख दिला होती. परंतु त्यांची या दरम्यान काही व्यवस्था न झाल्याने आम्ही लवकरच माऊली शाखेचे कर्मचारी बँक शाखा संस्थापक अध्यक्ष नाशिक यांच्या निवासस्थानी जाऊन पुढील निर्णय घेऊ.

**ओमप्रकाश चतुरकार,** माऊली उप शाखाधिकारी हिवरखेड.

# तालुका पाटील समाज वधू वर परिचय मेळावा समितीची नियोजन सभा

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**तेल्हारा :** तालुका पाटील समाज वधू वर परिचय मेळावा समितीचे वतीने आयोजित वधू वर परिचय मेळावा 1 नोव्हेंबर 2026 रोजी घेण्याच्या दृष्टीने 31 ऑगस्टला संध्याकाळी नियोजन सभा भागवत वाडी येथे झाली.

वधू वर परिचय मेळावा समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या सभेमध्ये सर्वानुमते यावर्षी होणारा वधुवर परिचय मेळावा दिनांक 1 नोव्हेंबर रोजी रविवारी

आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. यामध्ये जास्तीत जास्त समाज बांधव समिती सोबत कसे जुळतील याबाबत प्रयत्न करण्याचे ठरले तसेच इच्छूक वधूवर यांनी मंचावर जाऊन स्वतःचा परिचय देणाऱ्या मुला मुलींची संख्या वाढविणे, रेशीमगाठी पुस्तिकेमध्ये छापण्यात येणाऱ्या परिचय पत्रांची संख्या वाढविणे इत्यादी मुद्द्यावर चर्चा करण्यात येवून 1 नोव्हेंबर चा भव्य मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे सर्वानुमते ठरले. सभेत समितीचे अध्यक्ष यांनी येणारे विषयावर उपस्थित सदस्यांचे मत जाणून घेतले. समितीचे सचिव यांनी आभार व्यक्त केले. नियोजित सभेला तेल्हारा तालुक्यातील समितीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठात रक्षाबंधन

वि. प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोट :** सेंट पॉल अकॅडमी द्वारा संचलित लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठ अकोला रोड अकोट येथे दि. 29 ऑगस्ट 2026 रोजी बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा रक्षाबंधन सोहळा मोठ्या थाटा-माटात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लुणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर पातोंड, बचपन प्लेस्कूलच्या मुख्याध्यापिका कोमल मन्नी मॅडम, इनचार्ज विशाल चांदूरकर, ज्यु. कॉलेजच्या इनचार्ज सौ. निलिमा देशमुख मॅडम यांची मंचावर उपस्थिती होती. या कार्यक्रमात इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व मुलींनी राखी बांधून आपल्या प्रेमळ भावना व्यक्त केल्या. मुलांनी भेट म्हणून त्यांना पेन्सिल दिल्या.

# व्यंकटेश बालाजी स्कूलचे विद्यार्थी मेरिटमध्ये



प्रतिनिधी २ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** स्थानिक व्यंकटेश बालाजी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित पूर्व उच्च प्राथमिक वर्ग चौथी व वर्ग सातवी शिष्यवृत्ती परीक्षा 2026 मध्ये जिल्हास्तरीय शहरी विभागातून मेरिट यादीत स्थान मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे.

वर्ग सातवी मधून तनिष्का प्रेमळ मुंधडा 29 वि मेरिट, श्रीयोग शरद तांबडे 33 वा मेरिट तर वर्ग चौथी मधून आराध्या आत्माराम लटपटे 57 वी मेरिट, सक्षम ज्ञानेश्वर धडम 95 वा मेरिट, सिद्धी प्रेमळ मुंधडा 102 वी मेरिट आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने अध्यक्ष अवधूत ढेरे सर, सचिवा राजश्रीताई गोळे मॅडम, मुख्याध्यापिका सारिका कडू मॅडम, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय शिक्षक शाळा व्यवस्थापन व पालकांना देत आहेत.

# मुख्याधिकारी जाधव जनतेच्या दारी कधी? नागरिकांना प्रतिक्षा

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** शासनाच्या वतीने महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन करून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्यांचा तातडीने निपटारा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, दुसरीकडे मूर्तिजापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जाधव शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष जनतेत कधी उतरणार, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नगरपरिषद ही केवळ कार्यालयीन कामकाजाची यंत्रणा नसून शहरातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्याची महत्त्वाची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे मुख्याधिकारी या पदावर विराजमान असलेल्या अधिकाऱ्याची जबाबदारी केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री कामकाज पाहण्यापुरती मर्यादित नसून शहरातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करणे, नागरिकांच्या अडचणी समजून घेणे आणि संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन समस्यांचे निराकरण करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.

मूर्तिजापूर शहरात सध्या रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, स्वच्छता, डासांचा वाढता प्रादुर्भाव, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न, सार्वजनिक ठिकाणांची देखभाल तसेच विविध नागरी सुविधांशी संबंधित समस्या नागरिकांसमोर आहेत. या समस्यांकडे प्रशासनाने संवेदनशीलतेने पाहणे अपेक्षित आहे. अनेकदा नागरिकांकडून निवेदने देऊन किंवा तक्रारी करून समस्या मांडल्या जातात; मात्र अधिकारी स्वतः शहरात फिरून परिस्थितीची पाहणी करतो तेव्हा समस्येचे गांभीर्य अधिक प्रभावीपणे लक्षात येऊ शकते.

'जनतेची सेवा हीच प्रशासनाची खरी ओळख' असे मानले जाते. त्यामुळे मुख्याधिकारी जाधव यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयाबाहेर पडून शहरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करावी, नागरिकांशी संवाद साधावा आणि त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकीकडे शासन जनतेच्या दारात जाऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अभियान राबवत असताना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रमुख अधिकाऱ्यानेही त्याच धर्तीवर 'जनता संवाद' किंवा प्रत्यक्ष शहर पाहणीचा उपक्रम सुरू करावा, अशी मागणी नागरिकांतून पुढे येत आहे.

मुख्याधिकारी जाधव हे शहरातील जनतेशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कधी बाहेर पडणार, याकडे आता मूर्तिजापूरकरांचे लक्ष लागले आहे. कार्यालयीन फाईलींपलीकडे जाऊन शहराच्या रस्त्यांवर उतरून वास्तव परिस्थिती जाणून घेतल्यास अनेक नागरी प्रश्नांना गती मिळू शकते, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. आता प्रश्न एकच— मुख्याधिकारी जाधव जनतेच्या दारी कधी पोहोचणार?




### बापूंचे नाव तर व्यवस्थित लिहा

टॉवर चौकात स्टेट बँक समोर दिशादर्शक फलक लावला आहे. त्यावर गांधी चौक या नावात मोठी चूक झाली आहे. गांधी यांच्या स्पेलिंग मध्ये Gandhi ऐवजी Ghandi असे चुकीने लिहिले आहे. अशा चूका होऊ नये असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# पुंडा नंदीग्राम येथे 'हर हर महादेव'चा गजर; तिसऱ्या श्रावणी सोमवारी हजारो भाविकांची गर्दी

वि. प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अकोट :** पुंडा (नंदीग्राम) येथे श्रावण मास यात्रा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांना हजारो भाविकांनी उपस्थिती लावत संपूर्ण परिसर शिवमय केला.

गावातील श्री नंदिकेश्वर शिवभक्त मित्र मंडळ, पुंडा तसेच शिवभक्तांच्या सहभागातून भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. यावर्षी शिवभक्तांनी वडद येथील पवित्र पूर्णा नदीतून ५१ भरण्यांमध्ये जल आणत पायी कावड यात्रा पूर्ण केली. गावात डीजेच्या तालावर आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या यात्रेने ग्रामस्थांसह भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यात्रेच्या समारोपावेळी कावडीतून आणलेल्या पवित्र जलाने श्री नंदी महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत धार्मिक विधींमध्ये सहभाग नोंदविला. श्रावण मास यात्रा उत्सवानिमित्त ह.भ.प. वासुदेव महाराज खोले गुरुजी (वरूड जऊळका) यांचे सांप्रदायिक कीर्तन तसेच ह.भ.प. मामारी महाराज (बांबर्डा) यांचे परंपरेनुसार काल्याचे कीर्तन संपन्न झाले. सांप्रदायिक भजन मंडळ, पुंडा तसेच बांबर्डा येथील ढोल-भजन मंडळींच्या भक्तिरसपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण नंदीग्राम परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. श्रावण महिन्यानिमित्त गावात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, श्री नंदी महादेवाच्या दर्शनासाठी दूरदूरवरून हजारो भाविक दाखल झाले होते. 'हर हर महादेव' आणि 'नंदी महाराज की जय'च्या घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले. यावेळी श्री नंदी महादेव संस्थान, पुंडा (नंदीग्राम) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

# कामगार नेते भाई मधुकर उतखडे यांना आदरांजली



**अकोला :** २९ रोजी स्थानिक भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कार्यालयात नयन गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. अहमद खा पठाण यांनी कामगार नेते भाई मधुकर उतखडे यांच्या तैलचित्राला हारार्पण करुन अभिवादन केले. उपस्थितानी भाई मधुकर उतखडे यांना लाल सलाम.... लाल सलाम असे नारे लावले. अहमद खा पठाण म्हणाले, कॉम्रेड मधुकर उतखडे यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी जीवन खर्ची घातले. कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालयात येथे कामगरांची बाजू लावून धरली. सविता प्रधान, कॉ. नयन गायकवाड यांनी भाई मधुकर उतखडे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

संचालन प्रविणा मनवर यांनी तर आभार प्रदर्शन कॉ. सुवर्णा घोडेस्वार यांनी केले. विनोद पोफळी, आरती बोबडे, संगीता माळी, शीला कात्रे, नीता टोरे, शितल दंदी, मंदा खडे, सोमय्या कैसर, संध्या, थोरात, प्रेमलता खांडके, योगिता मिटके, मेघा बोदडे, पारस आगरकर, आशा कर्मचारी, अनेक संघट्नेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकोट न.पा.च्या मुख्य प्रवेशद्वारास श्री नरसिंग महाराजांचे नाव द्यावे : संदीप भुस्कट

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अकोट :** शहराची ओळख आणि श्रद्धेचे केंद्र असलेल्या ग्रामदैवत श्री नरसिंग महाराजांचे नाव अकोट नगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारास देण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नरसिंग ग्रुपचे संदीप भुस्कट यांनी केली आहे. नगरपालिकेची प्रशस्त व देखणी इमारत असून, तिच्या मुख्य प्रवेशद्वाराला शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक ओळखीशी जोडणारे नाव देण्यात यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

विशेष म्हणजे, ही मागणी आज प्रथमच करण्यात आलेली नसून १४ सप्टेंबर २०१६ रोजी संदीप भुस्कट व त्यांच्या सहकाऱ्यांनी यासंदर्भात तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले होते. या निवेदनाची रिसीव्हड प्रत आजही आपल्याकडे उपलब्ध असल्याचे भुस्कट यांनी सांगितले. त्यावेळी संदीप भुस्कट, सचिन पागृत, नैमिष सेजपाल, वल्लभ जोत आणि सचिन पेठे यांनी एकत्रितपणे ही मागणी केली होती. ९ वर्षांपासून प्रलंबित मागणी

२०१६ मध्ये निवेदन देऊनही या मागणीवर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने पुन्हा एकदा हा विषय ऐरणीवर आणण्यात आला आहे. अकोट शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री नरसिंग महाराजांचे नाव नगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला देण्यात आल्यास शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला योग्य तो सन्मान मिळेल, असा विश्वास भुस्कट यांनी व्यक्त केला. ही मागणी कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात किंवा समर्थनार्थ नसून पूर्णपणे गैरराजकीय, विधायक आणि शहराच्या अस्मितेशी संबंधित आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या विषयाकडे राजकीय दृष्टिकोनातून न पाहता शहराच्या भावना आणि वस्तुस्थितीचा विचार करून सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**सर्वपक्षीय सहकार्याचे आवाहन :** या मागणीसाठी अकोटमधील सर्वपक्षीय नगरसेवक, पक्षश्रेष्ठी, पक्षप्रमुख तसेच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन संदीप भुस्कट यांनी केले आहे. नगरपालिकेच्या प्रवेशद्वाराला ग्रामदैवताचे नाव देण्याचा निर्णय हा संपूर्ण अकोट शहरासाठी अभिमानाचा विषय ठरू शकतो, असेही म्हटले आहे.

# ज्ञानपीठ पुरस्काराचा बहुमान मिळविणारे पहिले मराठी साहित्यिक!

### आज वि.स. खांडेकर यांचा स्मृतिदिन

विष्णू सखाराम खांडेकर यांचा आज स्मृतीदिन आहे. ते एक मराठी साहित्य विश्वातील अत्यंत प्रतिभावान आणि लोकप्रिय लेखक, कादंबरीकार व निबंधकार होते. त्यांच्या 'ययाती' या महाकादंबरीला १९७४ चा प्रतिष्ठित ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला असून, हा बहुमान मिळवणारे ते पहिले मराठी साहित्यिक आहेत. त्यांच्या साहित्यात मानवी मूल्ये, जिव्हाळा, समाजसुधारणा आणि उच्च नैतिक विचारांचा संदेश प्रकर्षाने दिसून येतो. 'उल्का', 'दोन ध्रुव', 'क्रौंचवध' आणि 'अमृतवेल' यांसारख्या त्यांच्या कादंबऱ्या मराठी वाचकांमध्ये आजही लोकप्रिय आहेत.

वि.स. खांडेकर यांचा जन्म महाराष्ट्रातील सांगलीत झाला. त्यांच्या पूर्वायुष्यात, त्यांची नाटकांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शन करण्याची आवड होती. वि.स.खांडेकरांचे लेखन ध्येयवादी आहे. अंतःकरणात समाजकल्याणाची व प्रगतीची तळमळ आहे. लालित्यपूर्ण भाषा, रम्य कल्पना, कोटीबाजपणा व समाजहिताचा प्रचार ही त्यांच्या लघुकथेची वैशिष्ट्ये आहेत. कल्पनाशक्ती अतिशय तल्लख असल्याने, तेजस्वी लेखनातून मनोरंजन करण्याबरोबर समाजजीवनावर भाष्य करणे हे त्यांच्या लेखनाचे स्वरूप होते. खांडेकरांच्या लेखनातून माणुसकीचा गहिवर दिसून येतो. त्यंच्या लेखनातून माणसावरील अपार श्रद्धा व्यक्त होते. रूपक कथा हा नवा प्रकार त्यांनी रुढ केला. त्यांनी कादंबरीसह कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, चित्रपट-कथा, नाटक, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत अगदी विपुल असे लेखन केले. वृत्तपत्रीय लेखन व ग्रंथ-संपादन या क्षेत्रांतही त्यांनी ठसा उमटवला. खांडेकरांच्या कथेत रचनाकौशल्य



व तंत्रनिपुणता आढळून येत नाही, पण कथालेखनातून व्यक्त होणारे जीवनदर्शन आणि धेयनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात, म्हणूनच तर वि.स.खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून ओळखले जातात. जीवनासाठी कला हे त्यांच्या समग्र लेखनाचे सूत्र होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट, दूरदर्शन मालिकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय व विदेशी भाषांत अनुवाद झाले. त्यांच्या उल्का या कादंबरीवर मराठी चित्रपट निघाला.

इ.स. १९२० साली खांडेकरांनी महाराष्ट्रातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडे या गावी शिक्षकी पेशास सुरुवात केली. तेथे त्यांनी इ.स. १९३८पर्यंत काम केले. ह्या काळात त्यांनी मराठी साहित्याच्या निरनिराळ्या प्रकारांमध्ये लेखन केले. आपल्या आयुष्यात त्यांनी १६ कादंबऱ्या, ६ नाटके, जवळपास २५० ललितलेख, १०० निबंध आणि कित्येक टीकाटिपण्ण्या लिहिल्या. गुजराती आणि तामिळ भाषिक लोक खांडेकर हे आपल्या भाषेतील सर्वात लोकप्रिय लेखक आहेत, असे म्हणतात. १९६५ साली मल्याळी भाषेतील कवी जी. शंकर कुरुप यांचा कवितासंग्रह १९२० ते १९५८ या काळातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती म्हणून भारतीय ज्ञानपीठाने निवडला आणि एक लाख रुपयांचा घसघशीत पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तेव्हापासून भारतीय ज्ञानपीठातर्फे दिला जाणारा हा पुरस्कार भारतीय साहित्यसृष्टीतील सर्वोच्च सन्मान समजला जातो. वि. स. खांडेकर हे त्या पुरस्काराचे पहिले मराठी मानकरी. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांची या पुरस्कारासाठी कशी निवड झाली, हे सांगणे औचित्यपूर्ण ठरेल. २८ सप्टेंबर १९७५ रोजी पुरस्कार घोषित होण्यापूर्वी नाना प्रकारच्या व्याधींशी झगडत असलेल्या वृद्ध खांडेकरांना पुरस्कार जाहीर झाल्यावर काही आनंदाचे क्षण अनुभवायला मिळाले. दिवा विझण्यापूर्वी काही क्षण तो बराच प्रकाश देतो म्हणतात, तसे. २६ फेब्रुवारी १९७६ रोजी दिल्लीच्या विज्ञानभवनात पुरस्कार देण्याचा समारंभ झाला आणि त्याच वर्षीच्या २ सप्टेंबर १९७६ला त्यांचा थकला-भागलेला देह मृत्यूच्या स्वाधीन झाला.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# सभापती श्याम धोंगे यांना धक्का; एकजुटीने बदल

## अविश्वासानंतर सभापतिपदासाठी आता मोर्चेबांधणी

प्रतिनिधी २ सप्टेंबर




तेल्हारा : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्याम धोंगे यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव विशेष सभेत मंजूर झाल्यानंतर आता बाजार समितीतील सत्तासमीकरणे ढवळून निघाली आहेत. सभापतिपदावरून धोंगे यांना पायउतार व्हावे लागणार असल्याने नवीन सभापती कोण, याची चर्चा सहकार क्षेत्रासह तालुक्यातील राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सभापतींविरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास प्रस्तावाला १८ पैकी १२ संचालकांनी पाठिंबा दिला. नियमानुसार आवश्यक दोन-तृतीयांश बहुमताने प्रस्ताव मंजूर झाल्याने विद्यमान सभापतींच्या नेतृत्वाला मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे अविश्वास प्रस्तावाच्या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रशासकीय पातळीवर हालचाली झाल्यानंतर हा निर्णय झाल्याने बाजार समितीतील अंतर्गत मतभेद आता उघडपणे समोर आले आहेत. अविश्वास प्रस्ताव मंजूर करून विद्यमान सभापतींना हटवणे ही पहिली पायरी ठरली. मात्र, त्यानंतर एकमताने सक्षम नेतृत्व देणे आणि बाजार समितीचा कारभार सुरळीत चालवणे, ही संचालकांसमोरील खरी परीक्षा असेल.

शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ, बाजार समितीतील सुविधा, पारदर्शक कारभार आणि व्यापारी-शेतकरी हिताचे निर्णय यावर नव्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. अविश्वासानंतर आता पुढील सभापती कोण? या प्रश्नाचे उत्तर मिळेपर्यंत तेल्हारा बाजार समितीतील राजकीय घडामोडींवर तालुक्याचे लक्ष राहणार आहे. यामुळे आता यपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, यासाठी चुरस आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकरी व व्यापारी वर्गाशी थेट संबंधित असल्याने तिच्या नेतृत्वाला तालुक्यात विशेष महत्त्व आहे.

त्यामुळे सभापतिपदाचा बदल हा केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित न राहता तालुक्यातील राजकीय शक्तिसमीकरणांवरही परिणाम करणारा ठरू शकतो. अविश्वास प्रस्तावाच्या निमित्ताने कोणते संचालक कोणत्या गटासोबत आहेत, आगामी सभापती निवडीत कोणता गट निर्णायक ठरतो आणि पडद्यामागे कोणाची रणनीती आहे, याची चर्चा आता रंगू लागली आहे.

आता बाजार समितीच्या नेतृत्वाची धुरा कोणाकडे सोपवली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने एकत्र आलेले संचालक पुढील सभापती निवडीतही एकत्र राहतात का, हे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत संचालकांच्या बैठका, संपर्क व राजकीय भेटीगाठींना वेग येण्याची शक्यता आहे.

अविश्वास प्रस्तावासाठी आवश्यक असलेले संख्याबळ मिळवण्यात विरोधकांना यश आले. विशेष सभेत १२ संचालकांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केल्याने धोंगे यांच्या नेतृत्वावरील अविश्वास स्पष्ट झाला. त्यामुळे केवळ सभापती बदलाचा हा विषय नसून बाजार समितीच्या आगामी कारभाराची दिशा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

---

# ग्रामसभेतील आक्षेपार्ह भाषेप्रकरणी चौकशीची मागणी

## घरकुल योजनेतील कथित गैरव्यवहाराचीही चौकशी करा



### घरकुल योजनेच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह

ग्रामपंचायतीमध्ये आलेल्या घरकुल योजनेच्या लाभार्थी निवड व संबंधित कामकाजात मोठ्या प्रमाणात कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे घरकुल योजनेच्या संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारीमध्ये ग्रामपंचायतीच्या कामकाजात सरपंचांच्या उपस्थितीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सरपंच नियमितपणे ग्रामसभेत उपस्थित राहत नसल्याचा आरोप करत, त्यांच्या अनुपस्थितीत इतर व्यक्तींकडून कारभार हाताळला जात असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या आरोपांचीही अधिकृत चौकशी होऊन सत्यता स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**मूर्तिजापूर** : तालुक्यातील उमरी ग्रामपंचायतीमध्ये नुकत्याच झालेल्या ग्रामसभेदरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना उपसरपंचांनी कथितरीत्या आक्षेपार्ह व अपमानास्पद भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराची निष्पक्ष चौकशी करण्यासोबतच ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेतील कथित गैरव्यवहाराचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थ व तक्रारदारांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तक्रारदार वकारबीन अब्दुल सत्तार चाऊस, रा. उमरी अरव, पो. किनखेड, ता. मूर्तिजापूर यांनी पंचायत समिती, मूर्तिजापूरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. अर्जानुसार, २९ ऑगस्ट २०२६ रोजी उमरी येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायतीच्या कामकाजासंदर्भात सार्वजनिक प्रश्न ग्रामसभेत उपस्थित करण्यात आले. तक्रारीनुसार, संबंधित प्रश्नांना उत्तर देताना ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. अनिस बीन इद्रिस चाऊस यांनी तक्रारदाराशी कथितरीत्या आक्षेपार्ह व अपमानास्पद भाषेत संवाद साधला.

### चौकशी करून दोष आढळल्यास कारवाईची मागणी

तक्रारदाराने प्रशासनाकडे काही ठोस मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये ग्रामसभेतील संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करणे, ग्रामसभेचे इतिवृत्त, उपस्थिती नोंद, उपलब्ध व्हिडिओ व इतर पुरावे तपासणे, संबंधित उपसरपंचांकडून स्पष्टीकरण मागविणे आणि चौकशीत आरोप तथ्यात्मक आढळल्यास नियमानुसार प्रशासकीय कारवाई करणे, या मागण्यांचा समावेश आहे.

### "ग्रामसभा ही नागरिकांच्या प्रश्नांसाठीचे व्यासपीठ"

ग्रामसभा ही नागरिकांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत प्रश्न विचारण्याची आणि माहिती मागण्याची महत्त्वाची लोकशाही व्यवस्था आहे. त्यामुळे नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना पदाधिकाऱ्यांनी संयमाने व सन्मानपूर्वक उत्तरे देणे अपेक्षित असल्याचे तक्रारदाराने निवेदनात म्हटले आहे. भविष्यात ग्रामसभांमध्ये नागरिकांना सन्मानपूर्वक वातावरण मिळावे, यासाठी संबंधितांना आवश्यक निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली आहे.दरम्यान, तक्रारीसोबत उपलब्ध व्हिडिओ व इतर पुरावे सादर करण्याची तयारी असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून चौकशीचा अहवाल व त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीच्या प्रती उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला तसेच तहसीलदार, मूर्तिजापूर यांच्याकडेही देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता प्रशासन या तक्रारीची कोणती दखल घेते आणि चौकशीत नेमकी काय वस्तुस्थिती समोर येते, याकडे उमरी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे

---

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची परवानगी प्रक्रिया सुलभ व जलद करा : महापौर शारदा खेडकर

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अकोला** : आगामी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विविध परवानग्या मिळविताना कोणतीही धावपळ अथवा गैरसोय होऊ नये, यासाठी परवानगी प्रक्रिया सुलभ आणि जलद करण्यात यावी, अशा सूचना महापौर सौ. शारदा रणजित खेडकर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना गणेशोत्सवाच्या कालावधीत मंडप उभारणी, ध्वनिक्षेपक, पोलीस विभागाची परवानगी तसेच इतर आवश्यक प्रशासकीय परवानग्या घ्याव्या लागतात. यासाठी विविध विभागांशी संपर्क साधावा लागत असल्याने मंडळांच्या कार्यकर्त्यांचा वेळ वाया जाण्याबरोबरच त्यांना अनावश्यक त्रासाला सामोरे जावे लागू शकते.

ही बाब लक्षात घेता अकोला महानगरपालिका, पोलीस विभाग तसेच संबंधित शासकीय विभागांमध्ये योग्य समन्वय साधून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या परवानगीचे अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत. आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि परवानग्यांबाबत मंडळांना स्पष्ट माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. परवानगी प्रक्रियेदरम्यान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार जावे लागू नये तसेच कोणताही नाहक त्रास होणार नाही, याची प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून परवानगीची कार्यवाही वेळेत पूर्ण करावी. संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना कोणताही नाहक त्रास सहन करावा लागणार नाही. याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश महापौर सौ. शारदा खेडकर यांनी दिले.

## दिव्यांगांचे विविध प्रश्न प्राधान्याने सोडवा- गजेंद्र मालठाणे

**अकोला** : मतीमंद व आत्ममग्न बहुविकलांग मेंदूचा पक्षपात या दिव्यांग प्रकारात असलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनी कायदेशिर पालकत्व घेण्याकरीता अधिकाधिक संख्येने अर्ज दिव्यांग सक्षमीकरण विभागाला सादर करावे. दिव्यांग व्यक्तींचे विविध प्रश्न व अडचणी प्राधान्याने सोडवाव्यात, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिले. दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. तुषार जाधव सभेला उपस्थित होते. त्यांनी सभेत विषयाशी निगडीत आवश्यक माहिती सादर केली. या बैठकीला महापालिका अतिरिक्त आयुक्त, मुख्याधिकारी, जिल्ह्यातील नगर पंचायत, नगर परिषदचे प्रतिनिधी, जिल्हा शल्य चिकीत्सक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी आदी उपस्थित होते.

## होमगार्ड समादेशक बी.चंद्रकांत रेड्डी यांच्या वाढदिवसानिमित्त 30 वृक्षांची लागवड

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**पातूर** : अकोला जिल्हा होमगार्ड समादेशक तथा,अपर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला जिल्हा होमगार्ड कार्यालयाच्या परिसरात ३० वृक्षांची लागवड करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छांचा कार्यक्रम न करता वृक्षारोपणासारखा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. 'वृक्ष लावा,पर्यावरण वाचवा' हा संदेश देत वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.



या उपक्रमामुळे कार्यालय परिसरात हिरवाई वाढण्यास मदत होणार असून,पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे प्रशासिक अधिकारी अशोक आसोलकर,केंद्रनायक राजपूत,प्रमुख लिपिक शिवाजी आघाव,कनिष्ठ लिपिक भाग्यश्री देशमुख,सुनील पोहरे, बालक डोंगरे,शिपाई सावते,मानसेवी अधिकारी दिपक सूर्यवंशी,प्रेम दामोदर, अशोक इंगळे, राजू खडसे,सुधाकर कराळे यांच्यासह होमगार्ड जवान उपस्थित होते. कराळे यांच्यासह होमगार्ड जवान उपस्थित होते.

## अगरवेस भागात वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले

**अकोला** : जुन्या शहरातील अगरवेस, गुलजारपुरा या भागात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण पुन्हा वाढले आहे. दिवसातून चार, पांच वेळा वीजेचा लपंडाव सुरू असतो. रक्षाबंधनाच्या दिवशी सकाळी जवळपास दिड तास वीज पुरवठा नव्हता.

वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याची वेळोवेळी तक्रार करूनही महावितरण कंपनी तर्फे या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. मंगळवार पासून या भागात आपत्कालीन भारनियमन राबविण्यात येत असल्यामुळे वीज ग्राहक अधिकच त्रस्त झाले आहेत. वीज गळती आणि वीज चोरी वर नियंत्रण ठेवण्यात महावितरण कंपनी अपयशी ठरत आहे, त्याची शिक्षा वीज ग्राहकांना भोगावी लागते आहे.

---

## शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सकडून नागरिकांचे सर्वेक्षण

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अकोला** : शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातर्फे क्विक हिल फाउंडेशन पूणे यांच्या संयुक्त विद्यमाने कमवा व शिका योजने अंतर्गत सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षाच्या माध्यमातून सिंदखेड, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला येथे सायबर फसवणूक व सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीपर ग्राम सर्वेक्षण करण्यात आले.

सिंदखेडचे सरपंच पंकज वानखेडे तसेच डॉ. ऋषी अरुण धारस्कर यांनी या सर्वेक्षणासाठी सहकार्य व मार्गदर्शन केले. त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

हे सर्वेक्षण २४ ऑगस्ट २०२६ रोजी शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाच्या सर्व २० सायबर वॉरियर्सनी केले. या उपक्रमात अध्यक्ष आदित्य गोतमारे, सचिव ओम गुजर, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर तृप्ती निळकंठ आणि मीडिया डायरेक्टर सिया अग्रवाल यांच्यासह सर्व वॉरियर्सनी सक्रिय सहभाग घेतला.

## कस्तुरी संस्थेस मारवाडी युवा मंचचा कार्यगौरव पुरस्कार

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला** : शहराच्या सामाजिक क्षेत्रात १६ वर्षांपासून सातत्याने सेवाकार्य करणाऱ्या कस्तुरी सेवाभावी संस्थेस स्थानिक मारवाडी युवा मंच अकोला द्वारे कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मारवाडी युवा मंच शाखा अकोला ही संस्था दरवर्षी गणपती उत्सवात प्रबोधनात्मक कार्य करणाऱ्या व विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट ठरलेल्या गणेशोत्सव मंडळास "गणराया पुरस्कार' देऊन सन्मानित करत असते. यावर्षी या संस्थेने गणराया पुरस्कार वितरण समारंभात शहरातील विविध



क्षेत्रात काम करणाऱ्या ५ सेवाभावी संस्थांना कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानीत केले त्यात कस्तुरीचा देखील समावेश आहे. स्थानिक खंडेलवाल भवन सभागृहात झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार माजी आमदार गोपीकीसन बाजोरिया, माजी आमदार बबनराव चौधरी , माजी महापौर मदन भरगड, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲड. मोतीसिंह मोहता , मारवाडी युवा मंचचे प्रांतिक अध्यक्ष निकेश गुप्ता, अकोला अध्यक्ष जितेंद्र बोरा व अन्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते हा कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ॲड. किशोर बुटोले , सचिव संजय ठाकरे, कार्यकारिणी सदस्य संजय गायकवाड व अनिल पालवे यांनी स्वीकारला.

कस्तुरीच्या निरपेक्ष सेवा कार्याची दखल घेऊन मागील वर्षी नागपूर येथील धरमपेठ शिक्षण संस्थेने सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार प्रदान करून कस्तुरीच्या सेवाकार्याचा गौरव केला होता..

यंदा मारवाडी युवा मंच याने दखल घेतल्यामुळे संस्थेचे मनोबल वाढलं असून भविष्यात सेवाकार्यात अधिक बळकटी व गती येइल अशी प्रतिक्रिया प्रा. ॲड. किशोर बुटोले यांनी दिली.

## भगवान बाबा हे वंजारी समाजाचेच नव्हे तर हिंदू धर्माचे प्रेरणास्थान

### आ. रणधीर सावरकर यांचे प्रतिपादन

**अकोला** : संत भगवान बाबा महाराज यांनी वारकरी संप्रदाय समृद्ध करण्याचे काम केले. मराठवाड्यासह सनातन धर्माला शिकवण देऊन, मानवता, सामाजिक समरसता आणि ग्रामीण संस्कृती जपण्याचे काम करून समाजातील सर्व स्तरांचे कल्याण करण्याची भावना जागृत केली. भक्ती, श्रद्धा, विश्वास आणि समर्पण भावनेची शिकवण दिली, असे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. ते संत भगवान बाबा जयंती निमित्त आयोजित विठ्ठल वारकरी जयंती कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाला माधव मानकर, संदीप सोळंके, संतोष शिवरकर, गिरीश जोशी, पालवे महाराज, गावंडे काका, डॉ. अमित कावरे, शंकरराव वाकोडे, रवी गावंडे, रमेश ठाकरे, पंकज वाडीवाले यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी संप्रदायाचे अनुयायी उपस्थित होते.

---

## भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट; नगरपरिषदेचे नियोजन कुठे?

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अकोट** : अकोट शहरातील बाजारपेठेसह विविध गर्दीच्या भागांत भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याचे चित्र आहे. विशेषतः शाळकरी मुलांना या कुत्र्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. मात्र, समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना नगरपरिषद प्रशासनाचे भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्याचे नियोजन नेमके कुठे आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्बीजीकरण आणि लसीकरण हा महत्त्वाचा उपाय मानला जातो. मात्र, शहरात मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांचा वावर दिसत असताना निर्बीजीकरण आणि लसीकरणाची प्रभावी मोहीम का राबविली जात नाही? नगरपरिषदेकडून यासाठी ठोस नियोजन केले आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शाळा, बाजारपेठ, बसस्थानक आणि इतर गर्दीच्या परिसरात नागरिकांची मोठी वर्दळ असते. अशा ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा वावर असतानाही विशेष उपाययोजना का करण्यात येत नाहीत? एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का हा प्रश्न आहे.

कुत्र्यांच्या झुंडी अचानक दुचाकीस्वारांच्या मागे लागल्यास किंवा रस्त्यावर आल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. उद्या एखादा शाळकरी विद्यार्थी कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी झाला किंवा कुत्र्यांमुळे दुचाकीस्वाराचा अपघात झाला, तर त्याची जबाबदारी कोणाची?

## निधन वार्ता

### विजय खिरोडकार



**हिवरखेड:** जिल्हा परिषद महात्मा गांधी विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक विजय आत्माराम खिरोडकार यांचे 1सप्टेंबरला निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा आप्त परिवार आहे.

### शकुंतला झाड़े



अकोला. न्यू तापडिया नगरातील ओंकारेश्वर शिव मंदिर परिसरातील रहिवासी श्रीमती शकुंतला जनार्दन झाडे यांचे १ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

## गणेशोत्सवाच्या स्पर्धेत मंडळांनी सहभाग घ्यावा

**अकोला** : शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आली आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अधिकाधिक मंडळांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. ३२१३/२०२६ एम.जे.सी. क. २३०/२०२६

दिनांक २०/०८/२०२६ चौकशी तारीख - ०५/१०/२०२६

**अर्जदार** - १. मंगेश रामचंद्र ढोले, वय ३८ वर्ष, २. मिरा रामचंद्र ढोले, वय-५० वर्ष, ३. संगिता रामचंद्र ढोले, वय ४५ वर्ष, ४. माधुरी रामचंद्र ढोले, वय ४३ वर्ष, सर्व रा. हनुमान नगर, अकोट, ता. अकोट, जि. अकोला

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार क. १ ते ४ ने वडील नामे रामचंद्र शंकर ढोले हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. हनुमान नगर अकोट ता. अकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. ०३/०९/२००२ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत रामचंद्र शंकर ढोले यांची पत्नी व अर्जदार क. १ ते ४ यांची आई नामे पार्वतीबाई रामचंद्र ढोले ह्या दि. २८/११/२०२० रोजी हनुमान नगर अकोट ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत रामचंद्र शंकर ढोले यांचा मुलगा व अर्जदारांचा भाउ नामे उमेश रामचंद्र ढोले याचा दि. ०९/०७/२०२६ रोजी ओझोन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल अकोला येथे उपचारादरम्यान व अविवाहित असतांना मृत्यू झाला. तसेच मयत उमेश रामचंद्र ढोले यांना अर्जदार क. १ ते ४ यांचेव्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्ररण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २०/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# सूर्यघर योजनेतून 20 हजार घरांवर वीजनिर्मिती

## यवतमाळ जिल्ह्यात ७९ मेगावॅट सौरऊर्जा; वीजबिल शून्य करण्याकडे ग्राहकांचा कल

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**यवतमाळ** : घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारून स्वतःची वीज निर्माण करण्याकडे यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांचा कल वाढला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत २० हजार १६७ वीज ग्राहकांनी घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारले आहेत. या प्रकल्पांची एकत्रित क्षमता तब्बल ७९ मेगावॅट असून, त्यामुळे अनेक ग्राहकांना वीजबिलात मोठी बचत होत आहे.

दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून ग्राहकांना अनुदान दिले जाते. जिल्ह्यातील चार महावितरण विभागांत सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. यवतमाळ विभागात सर्वाधिक ८ हजार १९० ग्राहकांनी ३२.२५ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारले आहेत. पांढरकवडा विभागात ४ हजार ७४० ग्राहकांनी २०.३८ मेगावॅट, पुसद विभागात ४ हजार ६४७ ग्राहकांनी १६.६५ मेगावॅट, तर दारव्हा विभागात २ हजार ५९० ग्राहकांनी १०.२७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारले आहेत.

सौरऊर्जा प्रकल्प उभारणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये, तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळते.

एक किलोवॅट क्षमतेच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्मिती होते. घराच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यास ती वीजजाळ्यात पाठवून तिचे वीजबिलात समायोजन करता येते. त्यामुळे ग्राहकांचे वीजबिल मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होते.

### कार्यालयाच्या फेऱ्यांतूनही सुटका

- योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी pmsuryaghar.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. महाराष्ट्रात या योजनेसाठी कागदविरहित व्यवस्था विकसित करण्यात आली असून, अर्जापासून पुढील प्रक्रियेपर्यंत काम ऑनलाइन पद्धतीने करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

### नेट मीटरही विनामूल्य

- योजनेला चालना देण्यासाठी ग्राहकांना आवश्यक असलेले सौर नेट मीटर महावितरणकडून विनामूल्य पुरविले जात आहेत. मोबाईलवर सौरऊर्जा निर्मिती, वीज वापर आणि अतिरिक्त वीजनिर्मितीची माहिती मिळत असल्याने ग्राहकांना वीज वापराचे नियोजन करणे शक्य होत आहे.

### वीजबिल शून्यापर्यंत

- "घराच्या छतावर सौर यंत्रणा बसवून वीज ग्राहकांना आपले वीजबिल शून्यापर्यंत कमी करता येते. योजनेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयात येण्याची गरज नाही. संकेतस्थळावर नोंदणी करून ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा. महावितरणकडून ग्राहकांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल."अशी प्रतिक्रिया दिलीप दोडके, मुख्य अभियंता, महावितरण, अमरावती परिमंडळ यांनी दिली आहे.

# दिग्रसमध्ये अतिक्रमणावर हातोडा

## रस्ते मोकळे करण्यासाठी न.प.ची कारवाई



प्रतिनिधी २ सप्टेंबर

**दिग्रस** : दिग्रस शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणाच्या प्रश्नावर नगरपरिषदेने अखेर धडक कारवाई सुरू केली आहे. नगरपरिषद कार्यालय ते मानोरा चौक या मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. प्रशासनाच्या सूचनेनंतरही अतिक्रमण न हटविणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर नगरपरिषदेच्या पथकाने कारवाई केली. या मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, रस्ते मोकळे झाल्याने वाहतुकीला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

सार्वजनिक रस्ते, फुटपाथ आणि इतर जागांवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्याधिकारी केदारे यांनी दिला आहे. विशेषतः रस्त्यांवर भाजीविक्री करणाऱ्या विक्रेत्यांनी पर्यायी व्यवस्थेचा वापर करावा, अशी भूमिका नगरपरिषदेने घेतली आहे. दरम्यान, भाजी विक्रेत्यांसाठी नवीन भाजी मार्केट उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया नगरपरिषदेने राबविल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, अनेकदा लिलाव प्रक्रिया राबवूनही विक्रेत्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याची माहिती मुख्याधिकारी केदारे यांनी दिली. त्यामुळे रस्त्यावरील व्यवसायाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रशासन आणि विक्रेत्यांमध्ये समन्वयाची गरज निर्माण झाली आहे.

### निवडकांवर कारवाई नको

- अतिक्रमण हटाव मोहिमेचे नागरिकांनी स्वागत केले असले तरी कारवाई केवळ निवडक अतिक्रमणांपुरती मर्यादित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, फुटपाथ आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे समान निकषाने हटविण्यात यावीत, अशी नागरिकांची मागणी आहे.

# 'एनसीएमसी' कार्ड नोंदणीसाठी फरफट

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**कळंब** : एसटीच्या 'एनसीएमसी' कार्ड नोंदणीसाठी सोमवारी येथील बसस्थानकावर नागरिकांनी गर्दी केली होती. मात्र, दुपारपर्यंत संबंधित कर्मचारी अथवा प्रतिनिधी बसस्थानकावर दाखल झाला नसल्याने नागरिकांना दुपारपर्यंत ताटकळत राहावे लागले. एनसीएमसी कार्डसाठी नागरिक सकाळीच बसस्थानकात दाखल झाले होते. मात्र, तेथे कर्मचारी उपलब्ध नसल्याचे समोर आले. कर्मचारी कधी येणार, कार्ड वितरण कधी सुरू होणार, याबाबतही माहिती मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय झाली. प्रशासनाने केवळ योजना जाहीर न करता अंमलबजावणीही सुरळीत करणे गरजेचे आहे. कार्डसाठी निश्चित वेळ जाहीर करावी. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा किशोर केवटे यांनी दिला आहे.

# लोखंडी रॉड घेऊन जाणारा ट्रक पलटी

## रॉड अंगावर कोसळल्याने तरुण दबला; अर्जुना जवळील घटना

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**यवतमाळ** : नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर यवतमाळनजीक अर्जुना गावाजवळ लोखंडी रॉड घेऊन जाणारा ट्रक पलटी झाला. यामध्ये दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना आज मंगळवार दि. १ सप्टेंबर रोजी दुपारी घडली.

दिनेश शेंडे रा. घाटंजी असे जखमीचे नाव असून, तो यवतमाळहून आर्णीकडे दुचाकीने जात होते. दरम्यान, अर्जुना परिसरात लोखंडी रॉड घेऊन जाणारा ट्रक अचानक पलटी झाला. ट्रकमधील लोखंडी रॉड रस्त्यावर येऊन दुचाकीस्वार दिनेश शेंडे यांच्या अंगावर कोसळले. त्यामुळे ते गंभीररीत्या जखमी होऊन रॉडखाली दबले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. रॉड बाजूला करून जखमी तरुणाला बाहेर काढण्यात आले. दरम्यान, १०८ रुग्णवाहिका वेळेवर घटनास्थळी पोहोचल्याने गंभीर जखमी दिनेश शेंडे यांना तातडीने उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले.

राष्ट्रीय महामार्गावर अचानक घडलेल्या या अपघातामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी तडजोड नको

## शाळेत सुरक्षा जाळी, फवारणीची मागणी

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**पुसद** : नगर परिषदेच्या सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक २ मधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेतील खिडक्यांना तातडीने सुरक्षा जाळ्या बसवाव्यात तसेच संपूर्ण शाळा परिसरात मच्छर प्रतिबंधक फवारणी करून स्वच्छता राखावी, अशी मागणी यादव मारोती हाटे यांच्यासह पालकांनी केली आहे.

माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी शिक्षण घेतलेल्या या ऐतिहासिक शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे पालकांनी म्हटले आहे. सध्या डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका लक्षात घेता शाळा परिसरात नियमित मच्छर प्रतिबंधक फवारणी करणे आवश्यक आहे. शाळेतील काही खिडक्यांना सुरक्षा जाळ्या नसल्यामुळे डासांसह विविध कीटक तसेच विषारी प्राणी वर्गखोल्यांमध्ये शिरण्याची शक्यता आहे. परिसरात सापांचा वावर होण्याची शक्यताही लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करणे आवश्यक असल्याचे पालकांनी निवेदनात नमूद केले आहे. 'विद्यार्थ्यांची सुरक्षितता प्रथम' या भूमिकेतून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी यादव मारोती हाटे यांच्यासह पालकांनी पुसद नगर परिषदेचे मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, प्रशासन अधिकारी तसेच शिक्षण सभापती विठ्ठल खडसे यांना निवेदन दिले.शाळेतील खिडक्यांना सुरक्षा जाळ्या बसविणे, मच्छर प्रतिबंधक फवारणी करणे आणि शाळा परिसराची नियमित स्वच्छता राखणे यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे.

# विकासासाठी निधी देणार : ॲड.मोहिनी नाईक

## शेंबाळपिंपरीत दहा लाखांच्या सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**पुसद** : नामदार इंद्रनील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली शेंबाळपिंपरी व परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उर्वरित विकासकामांसाठीही प्रयत्न सुरू असल्याचे ॲड. मोहिनी नाईक यांनी सांगितले.

शेंबाळपिंपरी येथे जनसुविधा योजनेअंतर्गत माऊली मंदिरासमोरील सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन पुसद नगर परिषदेच्या अध्यक्षा ॲड. मोहिनी नाईक यांच्या हस्ते सोमवारी (ता. ३१) उत्साहात झाले.

दहा लाख रुपयांच्या निधीतून हा रस्ता करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुलभाई सिद्दीकी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सद्बाराव मोहटे, शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष रामकृष्ण चंदेल, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र साकला, पुसद पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश पागीरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संजय देशमुख, युवा कार्यकर्ते संग्राम देशमुख यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सरपंच तथा प्रशासक रवींद्र महल्ले यांनी त्यांच्या कार्यकाळात गावात पूर्ण झालेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. प्राथमिक आरोग्य केंद्र ते विठ्ठल-रुक्मिणी चौक या रस्त्यासह गावातील प्रमुख रस्त्यांच्या प्रस्तावित कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

अध्यक्षीय भाषणात जैनुलभाई सिद्दीकी यांनी शेंबाळपिंपरीतील प्रलंबित ग्रामीण रुग्णालयाचे काम मार्गी लावण्याची मागणी केली. तसेच जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर झालेल्या ९ कोटी ४० लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम निधीअभावी रखडले असून, ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी ॲड. मोहिनी नाईक यांच्याकडे केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार नंदकुमार बंग यांनी केले. सूत्रसंचालन राजेश वाहूळे यांनी, तर आभार गणेश पागीरे यांनी मानले. ग्रामविकास अधिकारी तुकाराम राठोड, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैनगंगा रेती साठ्यांवर 'महसूल'ची करडी नजर

## रॉयल्टी पावतीच्या गैरवापरावर लक्ष

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**उमरखेड** : पैनगंगा नदीपात्रातून मागील उन्हाळ्यात उत्खनन करून विविध ठिकाणी साठवून ठेवलेल्या रेतीची उचल सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर एकाच रॉयल्टी पावतीचा गैरवापर होऊ नये, यासाठी महसूल विभागाने रेती साठे आणि वाहतुकीची तपासणी सुरू केली आहे.

मागील हंगामात पैनगंगा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन करून विविध ठिकाणी साठवणूक करण्यात आली होती. बोरी रेती घाटातील रेती मराठवाड्यातील घारापूर परिसरात, तर दिघडी घाटातील रेती कामारी परिसरात साठविण्यात आल्याची माहिती आहे. आता या साठ्यांची उचल सुरू झाल्याने प्रशासनाने रॉयल्टी पावती आणि वाहतुकीच्या नियमांकडे विशेष लक्ष दिले आहे.

मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांच्या नेतृत्वाखाली महसूल पथकाकडून रेती साठे व वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे. पावतीवरील प्रमाणानुसारच रेतीची वाहतूक होते का, एका पावतीचा पुनर्वापर केला जात नाही ना, तसेच आवश्यक परवानग्या आहेत का, याची पडताळणी करण्यात येत आहे.

मागील काळात रेती उत्खनन व वाहतुकीबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने यंदा प्रशासनाने अधिक दक्षता घेतली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महसूल विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

# २ वर्षांपासून सिंचन विहिरीचे अनुदान रखडले

## शेतकऱ्याचा 'जलतरंग' आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**महागाव** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरीसाठी मंजूर झालेले अनुदान दोन वर्षांपासून रखडल्याने लाभार्थी शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. स्वखर्चाने विहीर खोदून बांधकाम पूर्ण केल्यानंतरही अनुदान मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

सवना येथील लाभार्थी शेतकरी गोविंदराव देशमुख यांनी याबाबत तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. येत्या पंधरा दिवसांत अनुदानाची रक्कम खात्यावर जमा न झाल्यास, योजनेतून बांधलेल्या विहिरीतील पाण्यात बसून 'जलतरंग' उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

रोहयोच्या माध्यमातून सिंचन विहिरीसाठी शंभर टक्के अनुदानाची योजना राबविली जाते. मात्र, लाभार्थ्यांना प्रथम स्वखर्चाने विहीर खोदून बांधकाम पूर्ण करावे लागते. त्यानंतर कागदपत्रे व कामाची पूर्तता तपासून अनुदान देण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून अनेक लाभार्थ्यांची रक्कम प्रलंबित असल्याने त्यांच्यावर आर्थिक भार वाढला आहे.

या प्रश्नावर मागील हिवाळी अधिवेशनातही चर्चा झाली होती. संबंधित मंत्र्यांनी आठ दिवसांत रक्कम जमा करण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, अद्याप पैसे न मिळाल्याने शेतकरी शासकीय कार्यालयांच्या चकरा मारत आहेत. प्रलंबित अनुदान तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# पांढरकवडा-झरी मार्गाची दुरावस्था

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**झरी-जामणी** : पांढरकवडा–झरी मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.

**अपघाताचा धोका वाढला**

माथार्जुनपासून सुमारे दोन ते अडीच किलोमीटर अंतरावरील मांडवा स्टॉप परिसरात पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना बाजू देताना वाहनचालकांची मोठी कसरत होत आहे.

दरम्यान, झरीकडून पांढरकवड्याकडे जाताना खोडपाखेडी पोड्यापासून पुढे जंगल परिसरात रस्त्याच्या डाव्या बाजूला मोठा खड्डा पडला आहे. या ठिकाणी वाहनांना बाजू देताना अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा खड्डा वाहनचालकांच्या लक्षात न आल्यास गंभीर दुर्घटना होण्याची भीती आहे.

पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्याची वास्तविक स्थिती लक्षात येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनधारकांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत तसेच रस्त्याच्या कडांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# पीक पाहणीसाठी कोतवालांनाही सुविधा द्या; महसूल सेवक संघटनेची मागणी

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**उमरखेड** : ॲग्री स्टॅक योजनेंतर्गत डिजिटल क्रॉप सर्व्हे मध्ये काम करण्यास इच्छुक ग्राम महसूल सेवक अर्थात कोतवालांना ई-पिक पाहणीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटना, उमरखेड शाखेने केली आहे. याबाबत तहसीलदार आर. यू. सुरडकर यांच्यामार्फत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले.

शासनाने डिजिटल क्रॉप सर्व्हे प्रणाली लागू केली आहे. मात्र, ई-पिक पाहणी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी, विलंब अथवा प्रणालीतील त्रुटींसाठी महसूल सेवकांना जबाबदार धरू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करताना जंगली प्राणी, सरपटणारे प्राणी तसेच नैसर्गिक आपत्तींचा धोका असल्याने कोतवालांना एक कोटी रुपयांचे विमा संरक्षण आणि ५० लाख रुपयांचे अपघात विमा कवच देण्याची मागणीही करण्यात आली. तसेच DCS प्रणालीवर महसूल सेवकांची नियमित सेवार्थ ओळख क्रमांकाद्वारे नोंदणी करावी, त्यांना तांत्रिक प्रशिक्षण द्यावे आणि शासनाकडून अँड्रॉइड भ्रमणध्वनी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

'माझी शेती, माझा सातबारा, मीच नोंदवीन माझा पीक पेरा' ही शेतकरी स्तरावरील पीक पाहणी व्यवस्था पूर्ववत सुरू ठेवावी, अशी मागणीही संघटनेने केली.

संघटनेचे अध्यक्ष अभिलाष गायकवाड, उपाध्यक्ष गोपाल काळबांडे, सचिव संघप्रिया वाघमारे यांच्यासह योगेश मारकवार, संतोष जाधव, कलीम शेख मदार, प्रकाश ससाने, भारत सूर्यवंशी, वसंत भांडवले, शामराव पोटे, कल्याण सोळंके आदींनी निवेदन दिले.

**नाव बदल जाहीरनामा**

मी, Shahebaz Surayya (शहबाज सुरैय्या), Passport No. W4492541 रा. महागाव, याद्वारे जाहीर करतो की माझे नाव यापुढे Mo Shahbaj Suraiyya (मो. शहबाज सुरैय्या) असे राहील.
यापुढे माझ्या सर्व शासकीय, पासपोर्ट, कायदेशीर, शैक्षणिक, बँकिंग व इतर सर्व अभिलेखांमध्ये माझे नाव Mo Shahbaj Suraiyya (मो. शहबाज सुरैय्या) असे नमूद करण्यात यावे आणि हे नाव माझे वैद्य नाव म्हणून ग्राह्य धरावे.

**नाव बदल जाहीरनामा**

मी, Shahebaz Surayya (शहबाज सुरैय्या), Passport No. W4492541 रा. महागाव, याद्वारे जाहीर करतो की माझ्या पासपोर्ट मध्ये माझ्या वडिलांचे नाव Mohummad Shafi ( मुहम्मद शफी) असे आहे. मी या द्वारे जाहीर करतो की माझ्या वडलांचे नाव (Mo Shafi) मो शफी असे राहील यापुढे माझ्या सर्व शासकीय, पासपोर्ट, कायदेशीर, शैक्षणिक, बँकिंग व इतर सर्व अभिलेखांमध्ये माझे हे नाव वैद्य नाव म्हणून ग्राह्य धरावे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

५

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# अमरावतीत रुग्णालय आगप्रकरणातील दोषींना सोडणार नाही!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा, गरज पडल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करू

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अमरावती :** अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीची घटना अत्यंत गंभीर असून,या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे.चौकशीत जो कोणी दोषी आढळेल, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. गरज पडल्यास दोषींविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल करण्यात येईल,असा इशारा महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी सोमवारी अमरावतीला गेलो होतो. घटनास्थळाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. गेल्यावर्षी या रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री असताना तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता.असे असतानाही ही दुर्दैवी घटना कशी घडली, याची सखोल चौकशी केली जात आहे. या चौकशीचा अहवाल आज सायंकाळपर्यंत किंवा उद्या सकाळपर्यंत प्राप्त होण्याची शक्यता आहे.

तसेच १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल पंधरवडा साजरा करण्यात येणार असून या कालावधीत वनहक्क पट्टे मिळालेल्या आदिवासी बांधवांना त्यांच्या जमिनीचे ७/१२ आणि ८-अ उतारे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. वनहक्क दाव्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी शेतकऱ्यांना कर्जमाफीसह केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. पावसाच्या परिस्थितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, नागपूर आणि अमरावती विभागात सरासरीपेक्षा सुमारे २२ टक्के पावसाची तूट आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रकृतीबाबत विचारले असता, यासंदर्भात आपल्याला सध्या सविस्तर माहिती नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. मात्र, त्यांची प्रकृती जाणून घेऊन त्यांना आवश्यक ते उपचार मिळावेत यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच फलटण येथील डॉक्टर आत्महत्या प्रकरणाबाबतही सखोल चौकशी करण्यात येईल,असे बावनकुळे यांनी सांगितले.

### व्हेंटिलेटरच्या स्फोटाचीही चौकशी

अमरावती येथील घटनेत ज्या व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्याचे सांगितले जात आहे, त्या व्हेंटिलेटरच्या पुरवठ्याबाबतही चौकशी सुरू असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. हाफकिन इन्स्टिट्यूटकडून राज्यात सुमारे दहा हजार व्हेंटिलेटर पुरविण्यात आले होते. अमरावतीच्या रुग्णालयात नेमके कोणते व्हेंटिलेटर बसविण्यात आले होते आणि या दुर्घटनेमागील नेमके कारण काय आहे,याचा तपास करण्यात येत आहे,असे त्यांनी सांगितले.

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या 101 व्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय कार्यक्रम

## बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे जयंती महोत्सव समितीचे आयोजन

प्रतिनिधी 2 सप्टेंबर



**अमरावती :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे उपाध्यक्ष दिवंगत बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या 101 व्या जयंती दिनानिमित्ताने 25 ते 27 सप्टेंबर तीन दिवसीय जयंती महोत्सवाचे आयोजनाची महत्त्वपूर्ण बैठक रिपब्लिकन पक्ष खोरीपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी प्राचार्य डॉक्टर गोपीचंद मेश्राम यांच्या निवासस्थानी संयुक्त रिपब्लिकन आघाडीचे अध्यक्ष ज्येष्ठविधीज्ञ डॉ. पी. एस. खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तीन दिवसीय जयंती महोत्सव आयोजित करण्याचा बैठकीत एकमताने ठराव घेण्यात आला.

. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जयंती निमित्ताने शुक्रवार(ता . 25) रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार(ता. 26) रोजी भिमटेकडी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दुचाकी रॅली तर रविवार (ता.27) रोजी संबोधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह येथे रिपब्लिकन चळवळीतील ज्येष्ठ व्याख्याते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे.

महत्त्वपूर्ण बैठकीला आंबेडकरी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वसंत शेंडे, सुदाम सोनुले, साची फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा जगदीश गोवर्धन, रिपाइचे अशांत रंगारी, पँथरचे हरिदास शिरसाट, खोरीपाचे रमेश रामटेके, प्रशिक मेश्राम, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे बुद्धदास इंगोले,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे, रविकांत गवई, प्रा.डॉ. संजय खडसे,प्रा.डॉ.रवी जुमळे,रमेश कटके, डॉ. प्रवीण जुमळे, प्रा. डा. देवीलाल आठवले,प्रा डॉ. प्रफुल्ल गवई यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटना शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात इंग्रजी भाषा मंडळाचे उद्घाटन

प्रतिनिधी 2 सप्टेंबर



**अमरावती:** श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात इंग्रजी भाषा मंडळ सत्र २०२६-२७ चे उद्घाटन विविध शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे दूरदृष्टी असलेले संस्थापक डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख आणि मातोश्री विमलाबाई देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख होत्या. तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या डॉ. पुनम बारब्दे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या संयोजक व कार्यशाळेच्या मार्गदर्शक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सविता डी. ठाकरे होत्या. डॉ. सविता ठाकरे यांनी प्रास्ताविकात विभागातर्फे वर्षभर राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व विशद केले. त्यानंतर इंग्रजी भाषा मंडळाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच ११ ऑगस्ट २०२६ रोजी इंग्रजी भाषा अभ्यास मंडळाच्या स्थापना दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध भाषिक खेळ व स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. डॉ. पुनम बारब्दे यांनी सत्र २०२६-२७ च्या इंग्रजी भाषा मंडळाचे अधिकृत उद्घाटन झाल्याचे जाहीर केले आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी 'इंग्रजी भाषेतील सुलेखन कौशल्याचे महत्त्व' या विषयावर अतिशय प्रभावी व्याख्यान दिले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांनी इंग्रजी विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमांमधून मिळणाऱ्या संधींचा भविष्यातील वाटचालीसाठी उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

# जादू टोण्याच्या संशयातून वृद्ध महिलेचा खून

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**धारणी:** मागील वर्षी चिखलदरा तालुक्यातील रेहट्याखेडा येथे जादूटोण्याच्या संशयातून एका वृद्ध महिलेची धिंड काढल्याच्या अमानुष घटनेला वर्ष पूर्ण होत नाही, तोच धारणी तालुक्यातील गोबरकहु येथे अंधश्रद्धेने पुन्हा एक जीव घेतला. जादूटोणा करत असल्याच्या संशयातून ५८ वर्षीय वृद्ध महिलेची गळा आवळून निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत खुनाचा उलगडा करीत आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

समोती रामभाऊ कासदेकर असे मृत महिलेचे नाव असून, रामलाल लक्ष्मण कासदेकर याला अटक करण्यात आली आहे.राजू रामभाऊ कासदेकर यांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदविला. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान गोबरकहु येथील शेतशिवारात समोती कासदेकर यांची हत्या करण्यात आली.

त्यांच्या गळयातील चांदीच्या टोगली कड्याने गळा आवळून हे कृत्य करण्यात आले.घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरविली. गुप्त माहितीच्या आधारे २८ ऑगस्ट रोजी आरोपी गावालगतच्या शेतात लपून बसल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

मृत महिला जादूटोणा करते आणि त्यामुळे आपल्या कुटुंबाला त्रास होत असल्याच्या संशयातून हत्या केल्याचे तपासात समोर आले. अंधश्रद्धेचा विळखा कायम एका बाजूला विज्ञानाच्या प्रगतीच्या गप्पा, तर दुसऱ्या बाजूला जादूटोण्याच्या संशयातून महिलांचे बळी-गोबरकहुच्या घटनेने समाजातील अंधश्रद्धेचा विळखा अद्याप किती घट्ट आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. रेहट्याखेड्यातील घटनेनंतरही मानसिकतेत बदल न झाल्याने हा प्रकार विशेष चिंताजनक ठरत आहे. अमानुष घटनेनंतरही मानसिकतेत बदल न झाल्याने हा प्रकार विशेष चिंताजनक ठरत आहे.

# पर्यावरण पूरक पद्धतीने सण साजरा

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**चांदुर रेल्वे :** रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर, वनस्पतिशास्त्र विभागाने पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा

करण्याचा उपक्रम हाती घेतला. अन्न, निवारा आणि वस्त्र या मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता निसर्गच करत असल्याने, सण साजरा करताना आपण निसर्गाला कसे विसरू शकतो? म्हणूनच, निसर्ग संवर्धन आणि परिसंस्था टिकवून ठेवण्यातील त्याचे महत्त्व यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी, वनस्पतिशास्त्र विभागाने सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प केला. वृक्ष संरक्षणाचे प्रतीक म्हणून विद्यार्थ्यांनी परिसरातील सर्वात जुन्या वृक्षाला फुलांपासून बनवलेली राखी बांधली. निसर्ग संवर्धनाच्या दिशेने उचललेल्या या पावलांबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वाडनेरकर आणि IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

हा कार्यक्रम वनस्पतिशास्त्र विभागाच्या 'सिम्बायोसिस' (Symbiosis) या विद्यार्थी संघटनेद्वारे आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. मीनल केचे, तसेच सहाय्यक प्राध्यापक डॉ. संपदा पाथर्कर आणि डॉ. प्रवीण सरदार उपस्थित होते.

# 7 सप्टेंबर रोजी जिल्हा लोकशाही दिन

**अमरावती:** जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, 7 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता 'जिल्हा लोकशाही दिना'चे आयोजन करण्यात आले आहे. तक्रारदारांना आवश्यक कागदपत्र व निवेदनांसह वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी निधी उपलब्ध करून देणार - आमदार संजय खोडके

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने दिले होते निवेदन

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणे प्रस्तावित आहे. या भवनाच्या निर्मितीस निधी उपलब्धीला घेऊन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने विधान परिषद आमदार - संजय खोडके यांची भेट घेऊन चर्चा केली. यावर विद्यापीठ परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन आमदार - संजय खोडके यांनी दिले. यावेळी चर्चा करतांना शिष्टमंडळाच्या वतीने आमदार - संजय खोडके यांना अवगत करण्यात आले कि, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे विविध अध्यासन केंद्रे कार्यरत असून, या केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थी अध्ययन व संशोधनाचे कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी विविध विषयांचे अध्ययन, संशोधन तसेच संदर्भ साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात यावे, अशी मागणी माजी सिनेट तथा व्यवस्थापन परिषद सदस्य - प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई यांनी केली होती.

या प्रस्तावाला तत्कालीन व्यवस्थापन परिषदेने मान्यता देत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यास तसेच नकाशा व प्रस्तावित पाच मजली भव्य इमारतीच्या आराखड्यास मान्यता दिली होती. त्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. मात्र, निधीअभावी या महत्त्वाकांक्षी भवनाचे काम अद्याप सुरू होऊ शकलेले नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन विधान परिषद आमदार - संजय खोडके यांना देण्यात आले. या निवेदनाची आमदार महोदयांनी आवर्जून दखल घेत विद्यापीठ परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन आमदार - संजय खोडके यांनी दिले. तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्तुळात साजेसे व शिक्षणाबरोबरच अध्ययन,प्रशिक्षण, संशोधन व विविध वाड्मयीन साहित्य तसेच संत व महामानवांचे दस्तावेज, दुर्मीळ साहित्य आणि भव्य फोटो गॅलरीच्या माध्यमातून तरुण पिढीला प्रेरणा व दिशादर्शन मिळावे, या उद्देशाने विद्यापीठ परिसरात प्रस्तावित डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचे काम मार्गी लावणार असल्याचा विश्वास आमदार - संजय खोडके यांनी व्यक्त केला.

# विविध स्पर्धांचे आयोजन व खेळाडूंचा गौरव करत क्रीडादिन साजरा

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अमरावती:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान विविध क्रीडा स्पर्धा, सायकल रॅली आणि खेळाडूंचा गौरव करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्याने 'एक घंटा खेल के मैदान मे' या संकल्पनेवर आधारीत विशेष क्रीडा उपक्रमाचे २८ ऑगस्ट रोजी उद्घाटन करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी येथील विभागीय क्रीडा संकुलात बॅडमिंटन,टेबल टेनिस,स्क्वॅश,आर्चरी,व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात क्रीडा उपसंचालक अविनाश पुंड यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह आणि सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले. शिव छत्रपती पुरस्कारार्थी नितीन चव्हाळे ,मंगेश व्यवहारे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमांतर्गत ३० ऑगस्ट रोजी विभागीय क्रीडा संकुल येथून 'संडे ऑन सायकल, रन अँड राईड' या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

आमदार संजय खोडके आणि राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त पराग नवलकर यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकस्वारांना रवाना केले. अमरावती सायकलींग असोसिएशनचे सायकलपटू ,खेळाडू,नागरीक, युवक-युवती या सायकल रॅलीमध्ये मोठया संख्येने सहभागी झाले.

# रक्तदान शिबिरातून माणुसकीचा संदेश

## आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २ सप्टेंबर



**अमरावती:** डफरिन महिला रुग्णालय येथे तीन नवजात चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. या मन सुन्न करणाऱ्या घटनेच्या पार्श्वभूमीवर गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्तदानाबाबत समाजात जनजागृती व्हावी, या सामाजिक भावनेतून रुग्णालय परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला आमदार बच्चू भाऊ कडू यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचे कौतुक केले. गंभीर अवस्थेतील रुग्णांसाठी रक्ताची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची असून, संकटकाळात रक्तदानाच्या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचविता येतात, असे यावेळी त्यांनी सांगितले. दुःखद प्रसंगानंतर खचून न जाता समाजाने संवेदनशीलतेने पुढे येऊन गरजूंच्या मदतीसाठी हातभार लावणे हीच खरी माणुसकी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

तीन नवजात चिमुकल्यांच्या मृत्यूची घटना अत्यंत वेदनादायी असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आरोग्य व्यवस्थेतील आवश्यक बाबींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध राहणे आणि गरजू रुग्णांना वेळेत रक्त मिळणे यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले. या रक्तदान शिबिरास शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीत शिवसैनिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून गरजू रुग्णांच्या मदतीसाठी आपला सहभाग दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी नियमित रक्तदान करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले. रक्तदान हे केवळ सामाजिक उपक्रम नसून एखाद्या गरजू व्यक्तीला जीवनदान देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे प्रत्येक सक्षम नागरिकाने रक्तदानाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. डफरिन रुग्णालयातील दुर्दैवी घटनेने निर्माण झालेल्या वेदनेच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरातून दुःखातून माणुसकीकडे आणि संवेदनशीलतेतून सेवाभावाकडे जाणारा सकारात्मक संदेश देण्यात आला. आमदार बच्चू भाऊ कडू यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे रक्तदानाचा हा उपक्रम अधिक व्यापक झाला.

# सावंगपूर नगरी जन्माष्टमीच्या भक्तिरसात रंगणार

## अखंड भजन, चंदनउटी,जन्माष्टमी उत्सव आणि गोपाळकाला

प्रतिनिधी 2 सप्टेंबर



**चांदुर रेल्वे:** अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री विठोबा संस्थान, श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे ४ सप्टेंबर शुक्रवार रोजी जन्माष्टमी निमित्त विविध भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रावण मास मांड अंतर्गत अखंड रात्रंदिन भजन सुरू राहणार असून दुपारी ४ वाजता जन्माष्टमी विशेष चंदनउटी उत्सव होईल. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता बाहेर गावातील भाविकांना महाप्रसाद वितरण करण्यात येईल.

रात्री ८ वाजता मुख्य मंदिरातून लहान मंदिरात पान, काकडी, मकई-कणीस, नारळ, फुलोरा, लाया-फुटाणे, कापूर ज्योत आदींसह आरतीच्या गजराने "जन्माष्टमी विशेष सोहळा" पार पडेल. मध्यरात्री १२ वाजता कापूर ज्योत आणि आरतीसह जन्मोत्सव साजरा होईल.

तसेच ५ सप्टेंबर शनिवार रोजी रात्री ८ वाजता कापूर ज्योतसह आरती आणि जन्माष्टमी निमित्त गोपाळकाला प्रसाद वितरण होईल. सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त मंडळ वसंत शेंडे , गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी यांनी केले आहे.



सोनार लूट प्रकरणाची चर्चा...

# शिरपूर झाले बिहार; पोलीसच बनवितात गुन्हेगार!

**● नाजीर शेख @ वाशीम ●**

वाशिम जिल्ह्यातील शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका सोनाराला कमी दरात सोनं विकण्याचे आमिष दाखवून तब्बल १० लाख रुपयांची लूट झाल्याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाची तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलेल्या सोनारालाच नकली नोटांच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या कथित लुटीमागे काही सराईत गुन्हेगारांसह एका पोलीस कर्मचाऱ्याचाही सहभाग असल्याचा आरोप होत असून संपूर्ण प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून लूट करणाऱ्या सराईत गुन्हेगारांसह यामध्ये सहभागी असलेल्या संबंधित दोषीं पोलिसांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



***कमी भावात सोने विक्रीचे आमिष दिले, सोनं न देताच १० लाख लुटले**
***पोलिसांची भूमिका संशयास्पद *शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना**

वाशिमच्या शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका सोनाराला सोन्याचे आमिष दाखवून तब्बल १० लाख रुपयांनी लुटल्याची घटना सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे. माहितीनुसार, काही सराईत गुन्हेगारांनी एका सोनाराशी संपर्क साधून त्यांला एका ठिकाणी सोनं सापडल्याचे असून ते कमी किमतीत विक्री करायचे असे सांगितले. इतकेच नव्हे तर, संबंधित सोनाराला सोनं दाखविण्यासाठी १९ ऑगस्ट रोजी शिरपूर परिसरातील वसारी येथील महामार्गालगत असलेल्या एका शाळेजवळ बोलावण्यात आले. सोनं पाहिल्यानंतर कमी किमतीत व्यवहार होत असल्याने सोनाराने ते खरेदी करण्यास होकार दिला. त्यानंतर संबंधित सोन्याचा सौदा सुमारे १० लाख रुपयांत ठरल्याचे सांगितले जाते. मात्र, त्या वेळी पैसे सोबत नसल्याने सोनाराने २० ऑगस्ट रोजी पैसे देऊन सोनं घेऊन जाण्याचे सांगितले. परंतु काही कारणास्तव तो २० ऑगस्ट रोजी जाऊ शकला नाही. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी तो १० लाख रुपये घेऊन ठरलेल्या ठिकाणी पोहोचला. यावेळी सोनं दाखविण्याच्या बहाण्याने दबा धरून बसलेल्या ७ ते ८ जणांनी त्याच्याकडील १० लाख रुपयांची बॅग हिसकावून पळ काढल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर घाबरलेल्या सोनाराने तक्रार देण्यासाठी शिरपूर जैन पोलीस ठाणे गाठले. मात्र, त्याची तक्रार न घेता त्यालाच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे तो तक्रार नोंदविल्याशिवाय तेथून निघून गेल्याची माहिती आहे. दरम्यान, चौथ्या दिवशी या घटनेची चर्चा शिरपूर जैन परिसरात पसरली. त्यानंतर या प्रकरणात शिरपूर जैन पोलीस ठाण्यातील 'महल्ले' नामक एका पोलीस कर्मचाऱ्याचा सहभाग असल्याची तसेच लूट करणाऱ्या व्यक्तींशी त्याचे संबंध असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोनाराला सोन्याचे आमिष दाखवून लूट झाल्याचे समजल्यानंतर संबंधित पोलीस कर्मचाऱ्याने लुटीतील १० लाख रुपयांपैकी ७ लाख ५० हजार रुपये स्वतःकडे ठेवून उर्वरित २ लाख ५० हजार रुपये लुटणाऱ्या व्यक्तींना दिल्याची चर्चा परिसरात रंगत आहे. सध्या एका सोनाराची पोलिसांच्या मदतीने लूट झाल्याची चर्चा परिसरात सुरू असून, या संपूर्ण प्रकरणाचा सूत्रधार शिरपूर जैन पोलीस ठाण्यातील 'महल्ले' नामक कर्मचारी असल्याचा आरोप काही नागरिकांकडून केला जात आहे. मात्र, या प्रकरणाबाबत शिरपूर पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे या घटनेबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी व दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिरपूर वासियांमधून होत आहे. आता या प्रकरणामागील सत्य समोर येणार की, हे प्रकरण पुन्हा दडपले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पोलीस कर्मचारी 'महल्ले' विरुद्ध अनेक तक्रारी; कारवाईची मागणी...

शिरपूर जैन हे जैन समाजाचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. येथे राज्यासह देशभरातून भाविक आणि पर्यटक दर्शनासाठी येत असतात. मात्र, शिरपूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या 'महल्ले' नावाच्या पोलीस कर्मचाऱ्या विरुद्ध अनेक तक्रारी असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. कर्तव्यावर असताना मद्यपान करून फिरणे, सर्वसामान्य नागरिकांशी गैरवर्तन करणे, गोरगरीबांना मारहाण करणे अशा विविध स्वरूपाच्या तक्रारी संबंधित कर्मचाऱ्याविरोधात वरिष्ठ स्तरापर्यंत, अगदी मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत पोहोचले आहे. मात्र, या तक्रारींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी शिरपूर परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## थोडक्यात

### जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा



**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा २९ व ३० ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सॉफ्ट टेनिस असोशीएसन यांच्या संयुक्त विद्यमाने सचिव राजदीप मनवर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडल्या.

स्पर्धेचे उद्घाटन २९ ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेमध्ये १९, १७ व १४ वर्षाखालील मुले, मुली यांनी सहभाग घेतला होता. १४ वर्षाखालील मुले व मुली विजेता सार्थक दिगंबर मुंदे, वेदांत राऊत, अधिरा खडसे, ऋग्वेदी जाधव, समिधा अरखराव, आयुष्य देशमुख, आशुतोष बेदेकर, निर्मिक मोरे, सृष्टी नरोटे, आराध्य खडसे, आयुष वानखडे यांनी स्पर्धा जिंकली. प्रथम पारितोषिक ५ हजार रुपये रोख, ट्रॉफी व मेडल तसेच द्वितीय ३ हजार रुपये रोख ट्रॉफी व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी अस्मिता भगत, मुख्याध्यापक धीरज पांडे, सहायक शिक्षक गजानन नरोटे, दिगंबर चंद्रकांत मुंदे, रवी गजभिये, दीपक वानखडे, निलेश वानखेडे, प्रकाश मोरे आदी उपस्थित होते.

### 'महागणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्णयानुसार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील नोंदणीकृत तसेच परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यंदा स्पर्धेची व्याप्ती वाढवून तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा विविध स्तरांवर करण्यात आली आहे. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांना आपली सांस्कृतिक, सामाजिक व पर्यावरणपूरक कामगिरी सादर करून मोठ्या पारितोषिकांची संधी उपलब्ध होणार आहे.

**नावात बदल - जाहीर नोटीस**

मी, बालयोगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी असून माझे जुने नाव - **गोपाल गुलाबराव देशमुख** असे होते. आता . माझे नवीन नाव -**बालयोगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी** (Balyogi Gopalnathji Yogi Balaknathji) माझे सर्व शासकीय, निमशासकीय, बँक व इतर सर्व व्यवहार, पत्रव्यवहार माझ्या नवीन नावाने करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. दोन्ही नावाची व्यक्ती एकच असून त्याबद्दल काहीही दुमत नाही. याकरिता ही जाहीर नोटीस देण्यात आली आहे.

**पत्ता -**
**योगी गोपालनाथजी योगी बालकनाथजी,**
मु. पो. रत्नगड, जि. हिंगोली.
जुने नाव - Gopal Gulabrao Deshmukh
नवीन नाव - Balyogi Gopalnathji Yogi Balaknathji

## पिकासाठी उर्ध्व मोर्णा प्रकल्पातून पाणीपुरवठ्याची मागणी

**मेडशी परिसरातील शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाणी द्या**

**● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●**

यावर्षी मोठ्या प्रमाणात हळद पिकाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांसमोर पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून, उर्ध्व मोर्णा प्रकल्प, मेडशी येथील उपलब्ध जलसाठ्यातून हळद पिकासाठी आवश्यकतेनुसार व नियंत्रित पद्धतीने पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत उर्ध्व मोर्णा प्रकल्प मेडशी लगतच्या तसेच लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी मंगळवारी, १ सप्टेंबर रोजी वाशिम येथे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

यावर्षी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी हळद पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. हळदीच्या लागवडीसाठी बियाणे, मशागत, लागवड, खते, औषध फवारणी आदींसाठी शेतकऱ्यांनी मोठा आर्थिक खर्च केला आहे. सध्या हळद पीक वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत असून, याच काळात पाण्याची कमतरता भासल्यास उभ्या पिकावर गंभीर परिणाम होऊन शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते, अशी चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



**जलसाठा जपण्यासोबतच पिकालाही जीवनदायी पाणी देण्याची मागणी**

उर्ध्व मोर्णा प्रकल्प, मेडशी येथे सध्या अंदाजे ६० ते ६५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून प्रशासनाने पाण्याच्या वापराबाबत निर्बंध घालण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचे शेतकऱ्यांनी मान्य केले आहे. 'जलसाठ्याचा अपव्यय नको; मात्र उभे पीकही वाया जाऊ नये,' अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे. प्रशासनाने पाण्याचे वेळापत्रक निश्चित करून, पाण्याच्या वापरावर मर्यादा घालून आणि आवश्यक त्या अटी लागू करून हळद उत्पादकांना पाणी उपलब्ध करून दिल्यास जलसाठ्याचे नियोजनही शक्य होईल आणि शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसानही टाळता येईल, असे निवेदनात म्हटले आहे. हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, अशी अपेक्षा निवेदनाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आली.

**निवेदन देताना शेतकरी उपस्थित**

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना शे. रज्जाक शे. चाँदभाई, मोहसिन खान सजावर खान पठाण, विनायकराव घुगे, उस्मान रेघिवाले, बशीरभाई गौरे, एकनाथ बहादुरे, शब्बीर रेघिवाले, शारुख गौरे, तन्नू रेघिवाले, रंजू रेघिवाले यांच्यासह उर्ध्व मोर्णा प्रकल्प मेडशी लगतचे व लाभक्षेत्रातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## शांतता, समन्वय आणि उत्साहाने गणेशोत्सव साजरा करूया - जिल्हाधिकारी



**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

जिल्ह्यातील सण-उत्सवांची शांतता आणि सामाजिक सलोख्याची परंपरा यंदाही कायम ठेवत सर्वांनी एकत्रितपणे, गुण्यागोविंदाने आणि आनंदाने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

येत्या १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. गणेशोत्सव तसेच श्री गणेश विसर्जनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हास्तरीय शांतता समितीची सभा आज नियोजन भवन सभागृहात झाली. यावेळी अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी कुंभेजकर बोलत होते. सभेला जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, भूसंपादन उपजिल्हाधिकारी दीपक बाजड आदी उपस्थित होते. शांतता समितीचे इतरही समित्यांचे पदाधिकारी, उपस्थित होते. संचालन व आभार शिक्षक महेश देवळे यांनी मानले.

## चॅम्पियन चेस (बुद्धिबळ) स्पर्धेत विवांश रोशन बंग ला सुवर्णपदक !

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

वाशीम येथे आयोजित करण्यात आलेल्या ऑल इंडिया ओपन फिडे रॅपिड रेटिंग चेस (बुद्धिबळ) टूर्नामेंट २०२६ मध्ये वाशिमच्या चॅम्पियन चेस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या स्पर्धेमधे जवळपास ४०० खेळाडू होते. या स्पर्धेत विवाश माधुरी रोशन बंग ला सुवर्णपदक मिळाले आहे



या स्पर्धेत अनरेटेड खेळाडूंच्या गटातून चॅम्पियन चेस अकॅडमी, वाशिम येथे केवळ दोन महिन्यांचे प्रशिक्षण घेतलेल्या कु. धून मोहिता निकुंज देवानी हिने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अवघ्या चार वर्षांच्या धूनने आत्मविश्वासाने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने बुद्धिबळाचे डाव खेळत 'सर्वात कमी वयाची उत्कृष्ट खेळाडू' हा विशेष पुरस्कार पटकाविला. तसेच कु. दित्या अंकिता सौरभ सोमानी हिनेही उत्कृष्ट कामगिरी करत ११ वर्षाखालील मुलींच्या गटात सातवा क्रमांक पटकावून पारितोषिक प्राप्त केले. तिच्या या यशामुळे अकॅडमीच्या यशात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला. याशिवाय चॅम्पियन चेस अकॅडमीचे विद्यार्थी मास्टर विवांश माधुरी रोशन बंग, मास्टर विभुम पुनम रामेश्वर बाहेती आणि मास्टर आरुष श्रीता अश्विनकुमार हाके यांनीही स्पर्धेत दमदार कामगिरी करत स्वर्णपदक प्राप्त केले.

## पॉक्सो प्रकरणात तरुणाची निर्दोष मुक्तता

**वाशीम अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल**

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

येथील अतिरिक्त सत्र न्यायाधिशांनी पोक्सो (इध्णएध) आणि बलात्कार प्रकरणातील आरोपीची सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एस. सहस्त्रबुद्धे यांच्या न्यायालयाने २४ ऑगस्ट २०२६ रोजी हा निकाल दिला. या प्रकरणात गोहागाव हाडे (ता. रिसोड, जि. वाशिम) येथील रहिवासी असलेला २२ वर्षीय मजूर निलेश उर्फ बंटी शांताराम वाघमारे याच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

घटनेच्या पार्श्वभूमीनुसार, २१ फेब्रुवारी २०२० रोजी दुपारी २:०० ते ४:०० वाजेच्या सुमारास पीडित मुलगी अचानक बेपत्ता झाली होती. तिच्या वडिलांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवल्यानंतर सुरुवातीला अपहरणाचा (भादंवि ३६३) गुन्हा दाखल झाला. तपासादरम्यान मुलगी सापडल्यानंतर तिने दिलेल्या पूरक जबाबाच्या आधारे पोलिसांनी प्रकरणात बलात्कार (भादंवि ३७६(२)(ग)), जीवे मारण्याची धमकी (भादंवि ५०६) आणि पोक्सो कायद्यांतर्गत (कलम ३ व ४) अतिरिक्त कलमे समाविष्ट करून आरोपीला अटक केली होती. न्यायालयात खटल्याच्या



सुनावणीदरम्यान फिर्यादीच्या वतीने सरकारी वकील आणि आरोपीच्या बाजूने ॲड. एम. डी. इंगोले व ॲड. पी आर चोपडे यांनी युक्तिवाद केला. आरोपीचे वकील ॲड. एम. डी. इंगोले व ॲड. पी आर चोपडे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, घटना घडली तेंव्हा पीडित मुलगी अल्पवयीन होती हे सिद्ध करणारा शाळा सोडल्याचा किंवा इतर ठोस दाखला सरकारी पक्ष सादर करू शकला नाही. तसेच पीडितेचा सुरुवातीचा जबाब, वैद्यकीय अहवाल आणि न्यायालयात दिलेली साक्ष यामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आणि विरोधाभास दिसून आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एस. सहस्त्रबुद्धे यांनी स्पष्ट केले की, पीडितेचे वय अल्पवयीन असल्याचे आणि तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार झाल्याचे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरला आहे. केवळ संशयावरून किंवा अपुऱ्या पुराव्यांच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येत नाही, हा कायदेशीर नियम विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी निलेश उर्फ बंटी शांताराम वाघमारे यास सर्व आरोपातून निर्दोष मुक्त केले.

## वाशीम येथे एमआयडीसी संपर्क कक्ष सुरु !

**व्यापारी व उद्योजक मंडळ, वाशिम जिल्हा यांच्या पुढाकाराने 'MIDC संपर्क कक्ष' सुरू**

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

वाशीम जिल्ह्यातील व्यापारी व उद्योजकांना उद्योगविषयक मार्गदर्शन तसेच एमआयडीसी संदर्भातील विविध अडचणींचे निराकरण स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी व्यापारी व उद्योजक मंडळ, वाशिम जिल्हा यांच्या पुढाकाराने बुधवार २ सप्टेंबर पासून वाशिम येथील जिल्हाधिकारी कार्यालयात एमआयडीसी संपर्क कक्ष सुरू करण्यात येणार आहे. यासाठी जुगलकिशोर कोठारी व नवीन शर्मा यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते.



उद्योजकांच्या सुविधेसाठी सुरू करण्यात येणाऱ्या या संपर्क कक्षाच्या माध्यमातून एमआयडीसी प्लॉट वाटपाशी संबंधित मार्गदर्शन तसेच एमआयडीसी संदर्भातील विविध समस्या प्रशासनाच्या माध्यमातून जिल्हास्तरावर सोडविण्यासाठी समन्वय साधला जाणार आहे. यामुळे वाशिम जिल्ह्यातील नव्या आणि विद्यमान उद्योजकांना आपल्या उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि प्रशासकीय सहकार्य अधिक सुलभपणे मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी यांची आठवड्यातून एकदा भेट व मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उद्योजकांना आपल्या एमआयडीसी संबंधित प्रश्न, अडचणी व प्रस्ताव थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. 'एमआयडीसी संपर्क कक्ष' चा प्रारंभ बुधवार, ०२ सप्टेंबर २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम जिल्हा येथून करण्यात येणार आहे. वाशिम जिल्ह्यातील सर्व व्यापारी, उद्योजक, उद्योग सुरू करू इच्छिणारे नवउद्योजक तसेच एमआयडीसी संबंधित कामे असलेल्या व्यावसायिकांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन व्यापारी व उद्योजक मंडळ, वाशिम जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**सुवर्ण संधीचा लाभ घेऊया आणि आपल्या उद्योगाला नवी दिशा देऊया!**
**व्यापारी व उद्योजक मंडळ, वाशीम**

## आरक्षणावर आक्षेप, तरीही निवडणूक

**तोंडगांवच्या जि. प. शाळेतील व्यवस्थापन समितीच्या निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह**

**● सिटी न्युज ब्युरो @ तोंडगाव ●**

तोंडगांव येथील जिल्हा परिषद केंद्र उच्च प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या आरक्षण प्रक्रियेवर तसेच त्याआधारे घेण्यात आलेल्या निवडणुकीवर पालकांनी आक्षेप घेतला आहे. शासन निर्णयातील तरतुदींशी विसंगत पद्धतीने आरक्षण निश्चित करण्यात आल्याचा आरोप करीत, सदर आरक्षण रद्द करून फेरआरक्षण निश्चित करावे व त्यानंतर नव्याने निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी पालक तथा सामाजिक कार्यकर्ते अनिल रामचंद्र गोटे यांनी केली आहे.

यासंदर्भात गोटे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन दिले आहे. २५ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार शाळा व्यवस्थापन समितीची रचना करताना उपेक्षित गट व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवडणूक प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, सदस्यांची निवड कोणत्या पद्धतीने करण्यात आली, मतदानाची अधिकृत नोंद, उपस्थितीपत्रक व इतिवृत्त उपलब्ध आहे का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून शासन निर्णय व लागू नियमांच्या विरोधात प्रक्रिया झाल्याचे आढळल्यास आरक्षण व निवडणूक प्रक्रिया रद्द करून नियमानुसार फेरआरक्षण निश्चित करावे आणि नव्याने निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी गोटे यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# रेशनच्या तांदळात भुसा, कचरा; धान्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

## धान्य खाण्यायोग्य नसल्याने लाभार्थी करतात विक्री !

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**खामगाव :** गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना अन्नधान्याचा आधार मिळावा, यासाठी शासनाकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून रेशन धान्याचे वितरण केले जाते; मात्र सध्या जिल्ह्यात सुरू असलेल्या मका धान्य वितरणात काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचा तांदूळ आणि मिळत असल्याच्या तक्रारी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहेत. मिळणारे धान्य खाण्यायोग्य नसल्याने काही लाभार्थी ते वापरण्याऐवजी विकत असल्याचेही सांगितले जात आहे.



जिल्ह्यातील विविध रेशन दुकानांमधून सध्या लाभार्थ्यांना धान्याचे वितरण सुरू आहे. या धान्यातील तांदळाचा दर्जा काही ठिकाणी अत्यंत खराब असल्याचा लाभार्थ्यांचा आरोप आहे. तांदळात तुटलेले दाणे, भुसा, कचरा तसेच अन्य अशुद्धता आढळत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे रेशनच्या धान्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**लाभार्थ्यांची अवहेलनाच !**

मोफत रेशनच्या नावाखाली लाभार्थ्यांच्या माथी उपयोग नसलेले धान्य मारण्याचा हा प्रकार अवहेलना करण्यासारखा असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. किमान उपयोगी धान्य उपलब्ध करण्याची मागणी होत आहे.

**गुणवत्तेची काटेकोर तपासणी गरजेची !**

धान्याचा दर्जा निश्चित करण्यासाठी संबंधित विभागाकडून धान्याची खरेदी, साठवणूक, वाहतूक आणि वितरण या सर्व टप्प्यांवर काटेकोर तपासणी होणे आवश्यक आहे.

रेशन दुकानांमध्ये निकृष्ट धान्य आढळल्यास त्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. तसेच लाभार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचीही गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.

# चोरट्यांकडून 9.40 लाखांचा मुद्देमाल जप्त

## खामगाव बसस्थानकातील गर्दीचा गैरफायदा

प्रतिनिधी 2 सप्टेंबर

**संशयित आरोपीला पाठलाग करून पकडले !**

» तपासादरम्यान संशयित आरोपीचा माग काढत त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीतील सोन्याचे दागिने तसेच इतर सोन्याच्या वस्तू आणि कार असा एकूण सुमारे ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.२९ ऑगस्ट रोजी याप्रकरणी गुन्हा दाखल करून जाधवला अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला १४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. प्रकरणाचा पुढील तपास खामगाव शहर पोलिस करीत आहेत.

**खामगाव :** बसमध्ये चढण्यासाठी झालेल्या गर्दीचा फायदा घेत, चोरट्याने ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत लंपास केली होती. या प्रकरणाचा खामगाव शहर पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात राजेश तुकाराम जाधव (३५, रा. साईगाव, जि. जालना) याला पोलिसांनी शनिवारी अटक केली असून, त्याच्याकडून सोन्याचे दागिने, सोन्याच्या अन्य वस्तू आणि कार, असा सुमारे ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२७ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास ६० वर्षीय महिला खामगाव बसस्थानकात बसमध्ये चढत होती. याचवेळी गर्दीचा फायदा घेत तिच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरल्याचा आरोप जाधववर आहे.

चोरीस गेलेल्या पोतीमध्ये पानाच्या आकाराचे डोरले, दोन मोठे मणी, दोन लहान मणी, आठ गहू मणी आणि २० बारीक सोन्याचे मणी होते. या दागिन्यांचे वजन सुमारे सात ग्रॅम असून, त्याची किंमत अंदाजे १ लाख ५ हजार रुपये आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर खामगाव शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपीला अटक केली.

# श्री. बालाजी वार्षिक पालखी उत्सव सोहळा, महाप्रसादाचा घेतला लाभ

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** सालाबादप्रमाणे श्री. बालाजी वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने श्री. बालाजी महाराजांची पालखी दि. २९/०८/२०२६ शनिवारी ठीक ४:३० मिनिटांनी आपल्या श्री. बालाजी मंदिरातून वाजत गाजत जुने भाजी बाजार मानाजी चौक खेर्डा वेस अशी होत वडशिंगी रस्त्यावरील चिंचखेड शिवारातील भाऊराव पाटील यांच्या शेतात पोहचली तेथे विधिवत पूजा, अभिषेक करून पुन्हा खेर्डा वेस मार्गे मानाजी चौक, विजय चौक, जुना भाजी बाजार ते श्री बालाजी मंदिरात पालखी थांबली त्यानंतर श्री बालाजी महाराजांची आरती ने पालखी सोहळयाची सांगता करण्यात आली.

या पालखी समोर दिंडी मध्ये टाळकरी विविध भजन गात होते हे पालखी उत्सवात लोकांचे आकर्षण केंद्र बनले होते या पालखी मध्ये नगरातील प्रतिष्टीत नागरिकांचा सुद्धा पालखी सेवा घेत आपला सहभाग नोंदवला हे विशेष.

श्री बालाजी मंदिरातून फुलांनी सजवलेल्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली होती विविध ठिकाणी भाविकांसाठी पिण्याचे पाणी व प्रसाद वाटपाची व्यवस्था गावातील नागरिकांच्या वतीने करण्यात आली होती

भगत परिवारासह मित्र मंडळानी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून पालखी सेवा दिली

तसेच दि. ३०/०८/२०२६ रविवार ला दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्री बालाजी महाराजांच्या आरती नंतर या महाप्रसादला सुरवात करण्यात आली होती यामध्ये पारंपारिक नैवेद्याचा समावेश होता मंदिर परिसरात स्वच्छता, पाणी व बसण्याची पुरेशी व्यवस्था करण्यात आली होती भाविकांनी सुद्धा शिस्त पाळून प्रसादाचा लाभ घेतलाउत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस व स्थानिक प्रशासनाने सुरक्षा देत आपली सेवा दिली

समस्त भगत परिवाराने सर्व भाविकांना त्यांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री.बालाजी महाराजांच्या पालखी ,महाप्रसाद व आशीर्वादाचा लाभ घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले

# तेली समाज पंच मंडळ जळगाव (जामोद) च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**जळगांव जामोद:** येथे समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहामध्ये पार पडला कार्यक्रमाचे नियोजन अतिशय चांगल्या प्रकारे होते.



समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला व्यासपीठ उपलब्ध होऊन योग्य मार्गदर्शन मिळावे व समाजातील लोकांनाच मानसन्मान मिळावा हा उदात्त हेतू ठेवून तेली समाज पंच मंडळ जळगाव जामोद व सर्व समाज बांधव यांच्या अथक परिश्रमामुळे मागील तेवीस वर्षापासून सदर कार्यक्रमाचे आयोजन होत असते असे आयोजकांनी सांगितले तसेच इतर सेवाभावी उपक्रम पंच मंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येतात सदर कार्य हे प्रेरणादायी असून समाजासमोर एक आदर्श आहे आपल्या सर्वांच्या कार्यामुळे सामाजिक एकता निर्माण होऊन एकमेका साह्य करू या भावनेतून समाजाची प्रगती निश्चितच होईल .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शरद गोमासे (सेवानिवृत्त शिक्षक )तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. आदित्य थोटांगे, जळगांव खान्देश ,दिपक तळे ,जळगांव जामोद, कृष्णा नायसे, पुणे, गणेश जामोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सामाजिक कार्यकर्ते ओंकारराव बोराखडे आणि पंचफुलाबाई नथले यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानानित करण्यात आले. तेली समाजातील एकूण 34 गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आले.यामध्ये इयत्ता 4 थी 6 विद्यार्थी,7व्या वर्गाचे 3 विद्यार्थी, वर्ग 10 वीचे 10 विध्यार्थी,वर्ग 12 वीचे 5 विद्यार्थी, आणि स्कॉलरशिप चे 6 विद्यार्थी बि. टेक 1,,आय टी आय 1,इंजिनियर 1, मेडिकल लेबटरी डिप्लोमा 1, यासर्वांना गौरविण्यात आले. प्रास्तविक तेली समाज पंच मंडळाचे सचिव श्यामभाऊ पांडव यांनी केले,यावेळी डॉ. आदित्य थोटांगे, दीपक तळे, कृष्णा नायसे, शरद गोमासे यांची समुचित भाषणे झाली.कार्यक्रमाचे संचालन संजय चोपडे तर आभार प्रदर्शन गणेश अरुडकार यांनीं केले. कार्यक्रमाच्या यशासाठी पंच मंडळाचे गणेश जामोदे ,राजेंद्र काथोटे,श्याम पांडव,नंदकिशोर काथोटे,संजय चोपडे,प्रा.रविंद्र खवणे, प्रदीप भागवत, संजय खेकाळे,सागर काचकुरे, मंगेश मंडवाले, प्रफुल्ल कावरे,शरद खवणे,गणेश अरुडकर,संतोष वेरुळकार, वैभव कावरे,तथा सर्व समाज बांधव, संताजी महिला मंडळ,संताजी युवा मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक नियुक्ती करा; संतप्त ग्रामस्थांनी शाळेला ठोकले कुलूप

## रोहणा येथील केंद्रीय मराठी शाळेतील प्रकार

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**खामगाव:** शिक्षक नियुक्तीच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयातच शाळा भरवून प्रशासनाचे लक्ष वेधल्यानंतरही प्रश्न मार्गी न लागल्याने अखेर रोहणा ग्रामस्थांचा संयम सुटला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक आणि ग्रामस्थांनी मंगळवारी आक्रमक पवित्रा घेत, रोहणा येथील केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेलाच कुलूप ठोकले. शिक्षक नियुक्तीचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

**आधी पंचायत समितीत भरली होती 'शाळा'!**

» शिक्षक नियुक्तीसाठी रोहणा येथील विद्यार्थ्यांनी यापूर्वी थेट पंचायत समिती कार्यालय गाठत अनोखे आंदोलन केले होते. विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांच्या दालनातच ठिय्या देत अक्षरशः शाळा भरवली होती. शैक्षणिक हक्काचा प्रश्न ऐरणीवर आणणाऱ्या या आंदोलनाची परिसरात चर्चा झाली होती.

खामगाव तालुक्यातील रोहणा येथील केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेत शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी, या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांकडून पाठपुरावा सुरू आहे. शाळेतील अध्यापन व्यवस्थेबाबत पालक व ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.विद्यार्थ्यांना नियमित व दर्जेदार अध्यापन मिळत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शाळेतील शिक्षिका व्यवहारे विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन करीत नसल्याची तक्रार पालक व ग्रामस्थांनी केली आहे. शिक्षकांची कमतरता आणि अध्यापनातील अनियमिततेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजली गोपाल बोचरे, सरपंच सविता गव्हाळे, उपसरपंच यशोदा खंडारे, शेषराव सावंग यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॉटेलमध्ये जेवताना प्रौढाचा मृत्यू; प्रशासनाने घेतले अन्नाचे नमुने !

## हॉटेलचा व्यावसायिक परवाना निलंबित !

प्रतिनिधी 2 सप्टेंबर

**मलकापूर :** येथील वल्ली चौकातील मदीना दरबार हॉटेलमध्ये जेवताना एका ५८ वर्षीय प्रौढाचा मृत्यू झाल्याची घटना ३० ऑगस्ट रोजी घडली. घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानुसार, अधिकाऱ्यांनी हॉटेलची पाहणी करून विविध खाद्यपदार्थाचे नमुने घेतले. दरम्यान, स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन आढळल्याने ३१ ऑगस्ट रोजी हॉटेलचा व्यावसायिक परवाना निलंबित करण्यात आला.

नारायणराव जाधव (५८) असे मृतकाचे नावे आहे. पोलिस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाला माहिती दिल्यानंतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून हॉटेलमधील तेल, आटा आणि रुमाली रोटीचे नमुने तपासणीसाठी घेतले, तसेच स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन झाल्याचा अहवाल सादर केला. दरम्यान, ३१ ऑगस्ट रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्तांसमोर हॉटेल मालकाची सुनावणी झाली.

या प्रकरणातील अन्नपदार्थाचे नमुने तसेच वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

# सहा फुटांपेक्षा लहान पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम कुंडातच !

## मोठ्या मूर्तींना नैसर्गिक जलस्रोतांची मुभा; अंतिम निकालापर्यंत हायकोर्टाचे अंतरिम निर्देश कायम

प्रतिनिधी 2 सप्टेंबर

**खामगाव :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तीच्या विसर्जनाबाबत निर्माण झालेला संभ्रम मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे दूर झाला आहे. अंतिम निकाल येईपर्यंत न्यायालयाने गतवर्षीचे अंतरिम निर्देश कायम ठेवले आहेत. त्यानुसार सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तीचे विसर्जन केवळ कृत्रिम तलाव किंवा कुंडात करावे लागणार आहे, तर सहा फुटांपेक्षा अधिक उंचीच्या मूर्तींना नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जनाची मुभा राहणार आहे.

गणेशोत्सवाच्या काळात पीओपी मूर्तीच्या विसर्जनावरून दरवर्षी पर्यावरणाचा मुद्दा ऐरणीवर येतो. यंदाही न्यायालयीन निर्देशांमुळे मूर्तीच्या उंचीनुसार विसर्जनाची व्यवस्था करावी लागणार आहे. गणेश मंडळांसह पालिका प्रशासनालाही विसर्जनाचे नियोजन त्यानुसार करावे लागणार आहे. अंतिम निकालानंतर या नियमांमध्ये बदल होतो का, याकडेही गणेशभक्तांचे लक्ष लागले आहे. लहान मूर्तीसाठी कृत्रिम कुंडांची उपलब्धता करण्याचे आव्हान स्थानिक प्रशासनासमोर राहणार आहे.

**विसर्जन नियम व मार्गदर्शक तत्त्वे काय ?**

सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन, नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे आणि विसर्जनानंतर मूर्तीचे अवशेष व्यवस्थित संकलित करणे यावर भर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी कृत्रिम तलावांची उपलब्धता सुनिश्चित करणे अपेक्षित आहे.

**मूर्तिकार, सार्वजनिक गणेश मंडळांना दिलासा**

न्यायालयाच्या स्पष्टीकरणामुळे मोठ्या पीओपी मूर्तीच्या विसर्जनाबाबत निर्माण झालेली अनिश्चितता तूर्त दूर झाली आहे. त्यामुळे मोठ्या मूर्तीची प्रतिष्ठापना करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना आणि मूर्तिकारांना तयारीसाठी दिलासा मिळाला आहे.

**पीओपीच्या मूर्तींना विरोध कशामुळे?**

पीओपी पाण्यात सहज विरघळत नसल्याने त्याचे अवशेष जलस्रोतांमध्ये साचण्याची शक्यता असते. त्यातून जलप्रदूषण आणि जलचरांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते. याच पर्यावरणीय मुद्द्यांवरून पीओपी मूर्तीच्या नैसर्गिक जलस्रोतांतील विसर्जनाला विरोध करणाऱ्या याचिका दाखल झाल्या आहेत.

# हर हर महादेवाच्या जयघोषाने दुमदुमली संतनगरी

प्रतिनिधी 2 सप्टेंबर

**शेगांव:** श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी शिवभक्त युवकांकडून कावड यात्रेचे शेगावात आयोजन केले होते. यामध्ये ११ कावड मंडळांनी यात्रेमध्ये सहभाग नोंदविला होता. भोले शंकर ओम नमः शिवाय चा जयघोषाने संत नगरी भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

श्रावण महिन्यात सोमवारी कावड यात्रेचे आयोजन करण्यात येते. ज्यामध्ये भगवान शंकराचा जलाभिषेक करण्यात येतो. त्यानुषंगाने शहरातील कावड मंडळांनी पायी प्रवास करून शहरापासून १५ कि.मी. अंतरावरील खिरोडा येथून पुर्णा नदीचे जल आणून भगवान शिवाला अर्पण केले. कावड यात्रेतील भगवान शिवशंकराच्या विविध स्वरूपातील विशालकाय मूर्ती लक्ष वेधून घेत होत्या.ज्यामुळे यात्रेत सहभागी शिवभक्तांमध्ये उत्साह संचारल्याचे दिसून येत होते. इथून जवळच असलेल्या खिरोडा येथील पूर्णा नदी पात्रातून शिवभक्त कावळयात्री यांनी पवित्र जल शहरातील विविध शिव मंदिरामध्ये शिवपिंडीवर जलाभिषेक केला.




संत नगरीत निघाली कावड यात्रा

पूर्णा नदीवर सकाळी पारंपरिक पूजन झाल्यानंतर १५ किलोमीटरच्या या यात्रेला प्रारंभ झाला. ढोल-ताशांच्या गजरात, हर हर महादेव आणि बम बम भोलेच्या जयघोषात हजारो शिवभक्त पुढे सरकत होते. शहरातील मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करताना सर्वत्र भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले. शहरातील अकोट रोडवर असलेल्या लालबाग देवी मंदिर परिसरातून ढोल ताशे व डीजेच्या दणदणाटात शेकडो शिवभक्तांच्या सहभागाने या कावड यात्रेला प्रारंभ झाला ही कावड यात्रा उड्डाणपुलावरून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे शहरातील मुख्य रस्त्याने काढण्यात आली. ठिकठिकाणी कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले. या कावड यात्रेत मोठ्या संख्येने तरुण व भाविक सहभागी झाले होते. दर वर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा विश्व हिंदू परिषद बजरंग दल च्या वतीने शहरातील कावडधारी यांना "श्रीराम खिचडी वाटप" कार्यक्रम राबविण्यात आले. शिवभक्तांच्या उत्साहाने आणि वाजत-गाजत काढलेल्या यात्रेने शेगाव नगरी दुमदुमून गेली होती. अत्यंत उत्साह पूर्ण आणि शांततेच्या मार्गान ही कावड यात्रा शहरात पार पडली.

**ठिकठिकाणी स्वागत अन सेवाकार्य**

कावडधारींचे स्वागत करण्यासाठी शहरातील विविध भागात सेवा केंद्रे उभारण्यात आली होती. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलसह विविध स्वयंसेवी व भाविकांसाठी पाणी, चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था केली. बजरंग दलाच्या वतीने ३ किंवटल खिचडीचे वितरण करण्यात आले.

कावड यात्रेचे आध्यात्मिक महत्त्व कावड यात्रा ही केवळ धार्मिक मिरवणूक नसून, तो श्रद्धा, संयम आणि सेवाभावाचे प्रतीक आहे. श्रावण महिन्यात पवित्र नदीत स्नान करून तीर्थजल कावडीत भरून पायी चालत शिवमंदिरात अभिषेकासाठी पोहोचवले जाते. या प्रवासात मानसिक शुद्धी, शारीरिक तपस्या आणि भक्तिभाव अनुभवायला मिळतो. शेगावमध्ये या यात्रेचे आगमन हे शहरासाठी आध्यात्मिक पर्वणी ठरले. कावड यात्रा उड्डाणपूलापासून चालू होऊन शिवाजी चौक, गांधी चौक, मंदिर परिसर या मार्गाने कावड यात्रा निघाली. कावडयात्रेदरम्यान शहरात कोठेही काही अनुचित प्रकार घडू नये, याची खबरदारी पोलिस प्रशासनाकडून घेण्यात आली होती. त्याकरिता चोख पोलिस बंदोबस्त पोलीस प्रशासनाच्या वतीने लावण्यात आला होता.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

८

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# हाथी, घोडा, पालखी जय कन्हैया...चा होणार गजर

## जन्माष्टमी निमित्त सजली बाजारपेठ... दहीहंडीची शहरात तयारी

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला:** भगवान कृष्णाचा जन्मदिवस असलेल्या जन्माष्टमीसाठी शहरात तयारीला वेग आला आहे. ४ सप्टेंबर रोजी येणाऱ्या जन्माष्टमी सणासाठी शहरातील विविध बाजारपेठांमधील दुकाने सजवण्यात आली आहेत. बाजारात भगवान कृष्णाच्या आकर्षक मूर्ती, तसेच पूजेचे साहित्य, झोपाळे, मुकुट, पोशाख आणि बाळ गोपाळाच्या सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तू उपलब्ध आहेत.जुने शहर, जठार पेठ चौक,कौलखेड चौक,डाबकी



रोड यांसारख्या शहरातील प्रमुख भागांमध्ये जन्माष्टमीसाठी विशेष दुकाने सजवण्यात आली आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानदारांनी भगवान कृष्ण आणि बाळ गोपाळ यांच्या विविध आकारांतील आणि डिझाइनमधील मूर्ती मांडल्या आहेत. यामध्ये लाडू गोपाळाच्या लहान मूर्तींपासून ते घराच्या सजावटीसाठी मोठ्या,





आकर्षक मूर्तींचा समावेश आहे. भगवान कृष्णाला लोण्याचे भांडे घेऊन, झोपाळ्यावर बसलेले, बासरी वाजवताना आणि विविध मनमोहक मुद्रांमध्ये साकार करण्यात आले आहे. विशेषतः महिला आणि मुले बाळ गोपाळाच्या मूर्ती आणि दागिन्यांची खरेदी करताना दिसतात. दुकानदारांनी सणाच्या अपेक्षेने विविध प्रकारच्या वस्तूंचा साठा करून ठेवला आहे.

### मुकुट, पोशाख आणि अलंकारांची मागणी

» बाळ गोपाळाला सजवण्यासाठी विशेष वस्तू देखील बाजारात उपलब्ध आहेत. दुकानांमध्ये भगवान कृष्णासाठी रंगीबेरंगी पोशाख, मुकुट, मोराची पिसे, बासरी, हार, पैंजण, बांगड्या, माळा आणि इतर विविध प्रकारचे दागिने दिसत आहेत. देवाला सजवण्यासाठी आकर्षक वस्त्रे आणि लहान दागिने देखील ग्राहकांना आकर्षित करत आहेत.

### शहरात दहीहंडीची सुद्धा जोरात तयारी

» जन्माष्टमी च्या दुसऱ्या दिवशी दहीहंडी फोडण्याची पद्धत आहे त्यानिमित्त शहरात विविध परिसरांमध्ये राजकीय पक्ष सामाजिक संघटना आदींनी दहीहंडी फोडण्याची स्पर्धा ठेवली आहे त्याकरिता गोविंदा पथके तयार झाले आहेत अनेक ठिकाणी चांगली बक्षीस सुद्धा ठेवण्यात आली आहेत दहीहंडी पाण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होते

# पेट्रोल नंतर आता वाहनांच्या पीयूसीच्या दरात वाढ

## पीयूसी शुल्कात 20 टक्क्यांनी वाढ

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला:** आधीच महागाईने डोके वर काढले आहे. जीवनावश्यक वस्तूंसोबतच पेट्रोल महागल्याने नागरिक अक्षरशः मेटाकुटिस आले असताना राज्यात वाहनांच्या पीयूसी तपासणी शुल्कामध्ये २० टक्के दरवाढ झाली आहे. त्यामुळे वाहन चालकांना पीयूसीला अधिकचे पैसे मोजावे लागणार असल्याने नाराजी आहे. पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीने वाहनचालक त्रस्त असताना आता परिवहन विभागाने पीयूसी शुल्कात २० टक्के वाढ केली आहे.

दुचाकी वाहनांसाठी आता ५० रुपयांऐवजी ६० रुपये मोजावे लागतील. राज्यातील महामार्गावरील टोल वसुली आणि खराब रस्त्याविरुद्ध नागरिकांच्या तक्रारी असताना आता पीयूसीची त्यात भर पडली आहे.




### का झाली पीयूसी ची दरवाढ?

» पीयूसी केंद्रांच्या संघटनेने या शुल्क वाढीची मागणी केली होती. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पीयूसी केंद्रचालकांनी आपला देखभाल खर्च तसेच नवीन उपकरणांची किंमत वाढल्याचे म्हटले आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन महागाईच्या तुलनेत वाढले आहे. त्यामुळे जुन्या शुल्कामध्ये पीयूसी देणे परवडत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. परिवहन विभागाने देशातील इतर राज्यांतील दरांचा अभ्यास केल्यानंतर ही वाढ सुचवली होती.

### कसे राहतील नवे दर!

» दुचाकी वाहने : जुने दर ५०, नवीन दर ६०
तीनचाकी वाहने : जुने दर १००. नवीन दर १२०,
चारचाकी (पेट्रोल/सीएनजी/एलपीजी) : जुने दर १२५ नवीन दर १५०.
डिझेल वाहने (सर्व): जुने दर १५०, नवीन दर १८०

# अकोल्यातील व्हॅन ह्यूसेन स्टोअर पॅन इंडिया ॲन्यूलाईझड श्रेणीत टॉपवर



प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला:** येथील रतनलाल प्लॉट मधील व्हॅन ह्यूसेन स्टोअरच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. आदित्य बिर्ला लाईफस्टाईल ब्रँड लिमिटेड भारत मध्ये क्वालिफाय करून पॅन इंडिया ॲन्यूलाईझ मध्ये टॉप केले आहे. अकोल्यासाठी ही गौरवाची बाब ठरली आहे.

अल्पावधीत मिळालेले यश स्पृहणीय आहे. रेडिमेड ब्रँडेड वस्रांच्या रेंज मध्ये व्हॅन ह्यूसेन स्टोअर्सनी आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली आहे. नव्याने सुरू झालेल्या व्हॅन ह्यूसेन स्टोअर साठी ही प्रतिष्ठित स्पर्धा घेण्यात आली. उत्तम कामगिरीच्या आधारे प्रशस्तीपत्र प्राप्त झाले. अकोल्यातील व्हॅन ह्यूसेन स्टोअरने सर्वोत्तम कामगिरी द्वारे यश मिळवले हे विशेष उल्लेखनीय. येथील फ्रेंचाईजी ओनर पंकज देशमुख, आदित्य देशमुख, स्टोअर मॅनेजर शाहरुख शेख, फैजान मिर्झा, नदीम खान, सोहेल खान यांच्या उपस्थितीत यशाचा आनंद साजरा करण्यात आला. सर्वांची मेहनत आणि टीमचे सांघिक यश आहे अशी भावना या निमित्ताने व्यक्त केली.

# अकोला जनता बँकेची दैदीप्यमान प्रगतीकडे वाटचाल

## सभासदांना ११% लाभांश, वार्षिक आमसभेत घोषणा

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला :** ५८ व्या वर्षात पदार्पण करतांना, अकोला जनता बँकेने आपले भागधारक, ग्राहक आणि हितचिंतकांच्या विश्वासावर नेत्रदीपक प्रगती केली असून, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे व्यवसाय करण्यासाठीचे निकष सर्वोत्कृष्ट पातळीवर पार केले असल्यामुळे बँकेला A वर्ग प्राप्त झाला असल्याची माहिती अकोला जनता बँकेचे अध्यक्ष रमाकांत खेतान यांनी टाळ्यांच्या गजरात दिली. जनता बँकेची ५७ वी वार्षिक आमसभा नुकतीच एका सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडली.

बँकेच्या स्थापनेपासूनच अतिशय सामान्य लोकांनी बँकेसोबत व्यवहार करून बँक आपलीशी केली. बँक स्थापन करतांना त्यावेळच्या संस्थापकांनी व इतर संचालकांनी बैंक सर्वसामान्यांच्या सेवेसाठीच राहील, अशी ग्वाही दिली होती. आणि आजचे संचालक आणि आजपर्यंत झालेले संचालक यांनी त्या विश्वासाने कार्य करून बँक ही जनतेची बँक बनविली. त्यामुळे आज बँकेचे जवळपास ७० हजारांहून अधिक भागधारक असून बँक अतिशय वेगाने आणि पारदर्शी व्यवहाराने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे, असेही यावेळी अध्यक्षांनी सांगितले. समाजातील विविध घटकांना आर्थिक आधार देऊन त्यांचा सर्वतोपरी विकास करण्यात बँक गेल्या ५७ वर्षांपासून हातभार लावित असून बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात केलेल्या प्रगतीचा आलेख अध्यक्ष रमाकांतजी खेतान यांनी उपस्थितांसमोर मांडतांना, वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेला २१ कोटी ८१ लाख ४० हजारांचा निव्वळ नफा प्राप्त झाला असून बँकेचा नेट एन.पी.ए. ०.०% आहे.



तसेच बँकेच्या सभासदांना ११% लाभांशाची घोषणा करतांना मा. खेतान यांनी बँकेचे नफा-तोटा पत्रक आणि ताळेबंदही सभेसमोर ठेवला. ग्राहकांना उत्तम सेवा देण्याच्या दृष्टिकोनातून बँकेने नेहमीच पुढाकार घेतला असून प्रचलित सर्व आधुनिक सुविधा बँक देत आहे असे सांगतांना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विलासचंद्र अग्रवाल यांनी मागील आमसभेचा वृत्तांत वाचून दाखविला. तर उपाध्यक्ष अनिलकुमार अग्रवाल यांनी अंदाजपत्रक सभेसमोर ठेवले, त्यास व नफ्याच्या विनीयोगास आमसभेने मान्यता दिली. बँकेचे वैधानिक अंकेक्षक पंकज अग्रवाल यांनी ऑडिट अहवालसंबंधी माहिती दिली. बँकेचे संचालक डॉ. सुभाषचंद्र तिवारी यांनी बँकेच्या पोटनियम दुरुस्ती संबंधात तपशीलवार विवेचन केले. बँकेचे संचालक संतोष गोळे यांनी आभार प्रदर्शन केले. आमसभेसाठी बँकेचे ज्येष्ठ संस्थापक संचालक साकरचंदजी शहा, ग्यानचंद गर्ग, गुरुमुखसिंग गुलाटी, सुनील तुलशान, डॉ. माणिक धुत, सी.ए. पंकज लदनिया, शिवप्रकाश मंत्री, शैलेन्द्र कागलीवाल, सी.ए. भरतकुमार व्यास, महेश कोठारी आणि बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष सी.ए. विक्रम गोलेच्छा, सदस्य प्रविण खंडेलवाल, सौ. अंकिता जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विनोद अग्रवाल आदी वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. भागधारकांच्या मोठ्या उपस्थितीत ही सभा उत्साही वातावरणात झाली.

### बँकेला विक्रमी नफा

» आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेने सर्व स्तरावर नेत्रदीपक प्रगती केली असून बँकेने या आर्थिक वर्षात जवळपास रु. २१ कोटी ८१ लाखांहून अधिक नफा मिळविला असल्याची माहिती या आमसभेत देण्यात आली.

### सभासदांना ११% लाभांश

» बँकेने गेल्या आर्थिक वर्षात ग्राहक आणि भागधारकांच्या विश्वासावर अतिशय जोमात वाटचाल केली असल्याने बँकेला विक्रमी नफा मिळाला. त्यामुळे भागधारकांना ११% लाभांश यावेळी घोषित करण्यात आला.

### शून्य टक्के NPA 0.0%

» बँकेने २०२५-२६ वर्षात साधलेल्या प्रगतीने आणि ग्राहकांच्या विश्वसनीय व्यवहारामुळे बँकेचा व्यवहार पारदर्शी राहिला आणि या व्यवहारामुळे बँकेचा एन.पी.ए. (०.०%) शून्य टक्के असल्याचे यावेळी टाळ्यांच्या गजरात जाहीर करण्यात आले.

# मुलीवरील अत्याचार प्रकरणात सावत्र पित्यास मरेपर्यंत जन्मठेप

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोट :** मुलीवर अत्याचार व पोक्सो प्रकरणात येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी शहरातील मोठे बारगण परिसरातील अण्णाभाऊ साठे नगरातील रहिवासी विजय छगन दवंडे (४०) या मुलीच्या सावत्र पित्यास विविध कलमांतर्गत मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा व ५० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली.

या प्रकरणात १० साक्षीदारांच्या साक्ष महत्त्वाच्या ठरल्या. सरकारतर्फे ॲड. अजित देशमुख यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यामध्ये प्रामुख्याने पीडिता मुलगी, तिची आई, वैद्यकीय अधिकारी व इतर साक्षीदारांच्या साक्ष महत्त्वाच्या ठरल्याने न्यायालयाने आरोपी विजय छगन दवंडे याला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, पोलीस उपअधीक्षक अकोट विभाग निखिल पाटील, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी, सहायक फौजदार प्रकाश जोशी, पोका अश्विन नवघरे यांनी पाठपुरावा केला.

आरोपीने तक्रार दिली होती की, त्याची मुलगी घरी कोणालाही न सांगता घरून निघून गेली. तिला अज्ञात इसमाने पळवून नेले, असा संशयही व्यक्त केला होता. त्यावरून पोलिसांनी कलम ३६३ भादंवि गुन्हा नोंद करून तपास सुरू केला. मात्र, तपासादरम्यान यातील पीडिता मुलगी तिच्या आईसह पोलीस स्टेशनला आली व तिने जबाब नोंदविला. या जबाबात तिने म्हटले की, फिर्यादी हा तिचा सावत्र वडील असून, त्याने तिचा अकोट येथे राहते घरी वारंवार विनयभंग केला. अकोला येथे भाड्याच्या खोलीत तिला शीतपेयामध्ये मद्य पाजून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. अशा जबानी रिपोर्टवरून शहर पोलिसांनी कलम ३६३, ३५४, ३७६ (२) (एफ), ३७६ (३), ५०६ भादंवि सह कलम ५ (एन) (पी), ६ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला. तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक संजय सोनटक्के, राजेश जवरे यांनी सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात सर्व आरोप सिध्द झाल्याने न्यायालयाने आरोपीस मरेपर्यंत जन्मठेप शिक्षा ठोठावली.

# मराठा उत्कर्ष सेवा मंडळ बहुउद्देशीय संस्था अकोला द्वारा भव्य सत्कार सोहळा

## गुणवंत विद्यार्थी, माजी सैनिक व पुरस्कार प्राप्त नागरिकांचा सत्कार

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला:** मराठा उत्कर्ष सेवा मंडळ बहुउद्देशीय संस्था अकोला द्वारा समाजातील दहावी, बारावी, नीट,सीईटी मध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, समाजातील माजी सैनिक व विविध क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त नागरिकांचा सत्कार सोहळा रविवार, 30 ऑगस्ट रोजी जुन्या आरटीओ रोडवरील मराठा सेवा संघ कार्यालयाच्या हॉलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर शशिकांत पवार, प्रमुख अतिथी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉक्टर मनीषाताई इथापे जाधव, सह आयुक्त उद्योग निलेश सुभाषराव निकम अमरावती, पुरुषोत्तम चव्हाण, लक्ष्मणराव मोढेकर व ओमराजे शेरे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माँ जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. मान्यवरांचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांद्वारा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. मनीषाताई इथापे जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वर्तमान काळात पदवी मिळून नोकरी मिळवणे आणि भौतिक सुविधांच्या लोभात अडकून दिमाखात



अहंकार निर्माण करणे ही मनोवृत्ती समाजाच्या देशाच्या विकास गतीत अडथळा निर्माण करू शकते. त्यापेक्षा विवेकाचे पूजक होऊन शिक्षणाद्वारे ज्ञानग्रहण स्वावलंबन व कला अभिरुचीचे साधन अध्ययन करा. ज्या क्षेत्रात जाल, तिथे आदर्श उत्तम व्यक्ती बनून समाजाच्या विकासासाठी जीवनभर झटले पाहिजे व समाजाचा विकास करण्यावर भर दिला पाहिजे असे म्हटले. निलेश निकम म्हणाले, आता येणाऱ्या पिढीने नोकऱ्यावर अवलंबून न राहता वेगवेगळ्या क्षेत्रात उद्योगधंदे उभारून आपले जीवनाचे सार्थक करून घेतले पाहिजे. याकरिता जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग धंद्यासाठी खूप योजना उपलब्ध असल्याचे सांगून समाज बांधवांना याविषयी पाहिजे ते सहकार्य मिळेल, असे प्रोत्साहित केले. ओमराजे शेरे यांनी, आता येणाऱ्या पिढीने मोठमोठ्या हुद्द्यावर जाऊन किंवा राजकारणात जाऊन आपली छबी उमटवावी व मोठमोठ्या मराठा राजांनी जे काम मराठा समाजासाठी केले ते आता येणाऱ्या पिढीने केले पाहिजे असे विद्यार्थ्यांना संबोधित केले. यावेळी संस्थेचे सचिव मनोहरराव गायकवाड यांनी प्रास्ताविकात संस्था कशी उदयास आली समाजासाठी काय करत आहे आणि पुढचे संकल्प काय राहणार यावर प्रकाश टाकला. कोषाध्यक्ष काशिनाथ तिकोडे यांनी आर्थिक लेखाजोगा वाचून दाखवला. यावेळी 30 विद्यार्थी, 2 नगरसेविका, 8 माजी सैनिक व विविध क्षेत्रातील 15 पुरस्कारा प्राप्त नागरिक असा एकूण 51 जणांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी, उपाध्यक्ष विलास काळे, सदस्य नागोराव चव्हाण, प्रा. लक्ष्मणराव जाधव, एड. आतिश कवडे, राजेश जाधव, युवराज कदम तसेच अकोला शहरासह अकोला वाशिम बुलढाणा जिल्ह्यातील मराठा समाज बांधव आणि विशेषतः महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शेवटी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशिकांत पवार यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली, कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे सदस्य डॉ. सचिन शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन एड. चेतन यादव यांनी केले.

# देशमुख महिला मंडळाच्या जिजामाता ग्रुपची मासिक सभा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २ सप्टेंबर

**अकोला :** देशमुख महिला मंडळाच्या जिजामाता ग्रुपची ऑगस्ट महिन्याची मासिक सभा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता हॉटेल सेंटर प्लाझा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती हर्षदाताई हर्षवर्धन देशमुख लाभल्या. याप्रसंगी मंचावर देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. राजश्रीताई देशमुख, ज्येष्ठ सल्लागार श्रीमती कविताताई ढोरे, कोषाध्यक्षा सौ. प्रतिभाताई देशमुख, सचिव सौ. स्वप्नालीताई देशमुख तसेच जिजामाता ग्रुपच्या अध्यक्षा सौ. अनिताताई देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर जिजामाता ग्रुपच्या वतीने मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मालिनीताई व जिजामाता ग्रुपच्या सर्व



सदस्यांनी श्री गजानन महाराजांचे भजन व गजर सादर करून संपूर्ण वातावरण भक्तिमय केले.यानंतर प्रमुख पाहुण्या श्रीमती हर्षदा ताई देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिजामाता ग्रुपच्या अध्यक्षा सौ. अनिताताईंनी मनोगत व्यक्त केले, तर देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ राजश्रीताईंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.देशमुख महिला मंडळातर्फे दर महिन्याला विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. याच सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय यावेळीही आला. बुलढाणा येथील दिव्या फाउंडेशनचे संचालक डॉ. काकडे यांचा मंडळाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिजामाता ग्रुपच्या वतीने दिव्या फाउंडेशनसाठी देणगी प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी डॉ. काकडे यांनी दिव्या फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक कार्याची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. देशमुख महिला मंडळातर्फे दर महिन्याला मंडळातील महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. श्रावण महिन्याचे औचित्य साधून यावेळी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेत प्रथम पारितोषिक सौ. यक्षमा, द्वितीय पारितोषिक सौ. शिल्पा संजय आणि तृतीय पारितोषिक सौ. सपना यांनी पटकावले.

यानंतर जिजामाता ग्रुपच्या सदस्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून सभेला रंगत आणली. 'अनेकता में एकता' या संकल्पनेवर आधारित सादरीकरणातून भारताच्या विविधतेतील एकतेचे सुंदर दर्शन घडविण्यात आले. त्यानंतर 'सावन के रंग, बॉलीवुड के संग' या संकल्पनेवर आधारित बहारदार नृत्य सादर करण्यात आले.

तसेच सोशल अवेअरनेस ॲक्ट अंतर्गत समाजजागृती करणाऱ्या नाटिका सादर करण्यात आल्या. मोबाईलचा अतिवापर, महिला सशक्तिकरण आणि नात्यांमधील भेदाभेद या विषयांवर प्रभावी संदेश देण्यात आला. जिजामाता ग्रुपच्या श्वेता–स्वप्ना, शिल्पा–तृप्ती आणि गौरी–वैशाली यांनी आपल्या प्रभावी अभिनयाने उपस्थितांची दाद मिळवली.

यानंतर राखी गेमचे आयोजन करण्यात आले. या खेळाचे संचालन ममता व कल्पना यांनी केले. सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत खेळाचा मनमुराद आनंद लुटला. राखी गेमच्या विजेत्यांमध्ये सौ. सिद्धी, सौ. केतकी, सौ. संगीता, सौ. रेवती गावंडे, सौ. संध्या ठाकरे, सौ. प्रियंका, सौ. नभा, सौ. रेवती, सौ. विद्या आणि सौ. जयश्री यांचा समावेश होता. जिजामाता ग्रुपच्या वतीने यावेळी 'प्लेन साडी आणि व्हेजिटेबल किंवा ड्रायफ्रूट ज्वेलरी' असा आगळावेगळा ड्रेस कोड ठेवण्यात आला होता. अनेक महिलांनी आपल्या कल्पकतेचा सुंदर वापर करून भाज्या व ड्रायफ्रूट्सपासून आकर्षक दागिने तयार केले होते. या अनोख्या संकल्पनेला सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाची शोभा वाढवली.ड्रेस कोड स्पर्धेतील विजेत्यांमध्ये सौ. राजश्रीताई, सौ. विद्या, सौ. शुभांगी, सौ. सीमा, सौ. प्रतिभा, सौ. मनीषा, सौ. वसुधा, सौ. वैशाली, सौ. निशा, सौ. स्नेहल, सौ. भावना, सौ. अनिता, कु. प्रमिला आणि सौ. मनीषा यांचा समावेश होता. यानंतर हाऊजी गेमचे आयोजन करण्यात आले. या खेळातही सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. हाऊजी गेमच्या विजेत्यांमध्ये सौ. प्रांजली, सौ. वर्षा, सौ. अनुराधा, सौ. वर्षा, सौ. जया, सौ. वर्षा, सौ. प्रगती, सौ. सारिका, सौ. शालिनी, सौ. अश्विनी, सौ. शुभांगी, सौ. सुचिता, सौ. विद्या, सौ. उज्वला आणि सौ. विजया यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीवनी यांनी केले, तर आभार प्रदर्शन माया देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिताताई, शैलजाताई, मालिनीताई, रजनीताई, मिलनताई, सुनंदाताई, कल्पनाताई, किरणताई, दिपालीताई, ममताताई, स्वप्नाताई, श्वेताताई, शिल्पाताई, वैशालीताई, तृप्तीताई, गौरीताई, मायाताई, संजीवनीताई आणि दीपाताई यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व सदस्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण मासिक सभा आनंदी, उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय ठरली.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135